# .. Dasbodh by Samartha Ramdasswami Chapter 8 ..
# ॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ८ ॥

दशक आठवा। :। मायोद्भव
समास पहिला : देवदर्शन
। । । । ॥श्रीराम ॥
श्रोतीं व्हावें सावध। विमळ ज्ञान बाळबोध ।
गुरुशिष्यांचा संवाद। अति सुगम परियेसा ॥ १॥
नाना शास्त्रें धांडोळितां। आयुष्य पुरेना सर्वथा ।
अंतरी संशयाची वेथा। वाढोंचि लागे ॥ २॥
नाना तीर्थें थोरथोरें। सृष्टिमध्यें अपारें ।
सुगमें दुर्गमें दुष्करें। पुण्यदायकें ॥ ३॥
ऐसीं तीर्थें सर्वहि करी। ऐसा कोण रे संसारी ।
फिरों जातां जन्मवरी। आयुष्य पुरेना ॥ ४॥
नाना तपें नाना दानें। नाना योग नाना साधनें ।
हें सर्वहि देवाकारणें। करिजेत आहे ॥ ५॥
पावावया देवाधिदेवा। बहुविध श्रम करावा ।
तेणें देव ठाई पाडावा। हें सर्वमत ॥ ६॥
पावावया भगवंतातें। नाना पंथ नाना मतें ।
तया देवाचें स्वरूप तें। कैसे आहें ॥ ७॥
बहुत देव सृष्टीवरी। त्यांची गनना कोण करी ।
येक देव कोणेपरी। ठाई पडेना ॥ ८॥
बहुविध उपासना। ज्याची जेथें पुरे कामना ।
तो तेथेंचि राहिला मना। सदृढ करूनि ॥ ९॥
बहु देव बहु भक्त। इच्छा जाले आसक्त ।
बहु ऋषी बहु मत। वेगळालें ॥ १०॥
बहु निवडितां निवडेना। येक निश्चय घडेना ।
शास्त्रें भांडती पडेना। निश्चय ठाई ॥ ११॥
बहुत शास्त्रीं बहुत भेद। मतांमतांस विरोध ।
ऐसा करितां वेवाद। बहुत गेले ॥ १२॥
सहस्त्रामधें कोणी येक। पाहे देवाचा विवेक ।
परी त्या देवाचें कौतुक। ठाई न पडे ॥ १३॥
थाई न पडे कैसें म्हणतां। तेथें लागली अहंता ।
देव राहिला परता। अहंतागुणें ॥ १४॥
आतां असो हें बोलणें। नाना योग ज्याकारणें ।
तो देव कोण्या गुणें। ठाई पडे ॥ १५॥
देव कोणासी म्हणावें। कैसें तयासी जाणावें ।
तेंचि बोलणें स्वभावें। बोलिजेल ॥ १६॥
जेणें केले चराचर। केले सृष्ट्यादि व्यापार ।
सर्वकर्ता निरंतर। नाम ज्याचें ॥ १७॥
तेणें केल्या मेघमाळा। चंद्रबिंबीं अमृतकळा ।
तेज दिधलें रविमंडळा। जया देवें ॥ १८॥
ज्याची मर्यादा सागरा। जेणें स्थापिलें फणिवरा ।
जयाचेनि गुणें तारा। अंतरिक्ष ॥ १९॥
च्यारी खाणी च्यारी वाणी। चौऱ्यासि लक्ष जीवयोनी ।
जेणें निर्मिले लोक तिनी। तया नाव देव ॥ २०॥
ब्रह्मा विष्णु आणी हर। हे जयाचे अवतार ।
तोचि देव हा निर्धार। निश्चयेंसीं ॥ २१॥
देव्हाराचा उठोनि देव। करूं नेणे सर्व जीव ।
तयाचेनि ब्रह्मकटाव। निर्मिला न वचे ॥ २२॥
ठाई ठाई देव असती। तेहिं केली नाहीं क्षिती ।
चंद्र सूर्य तारा जीमूती। तयांचेनि नव्हे ॥ २३॥
सर्वकर्ता तोचि देव। पाहों जातां निरावेव ।
ज्याची कळा लीळा लाघव। नेणती ब्रह्मादिक ॥ २४॥
येथें आशंका उठिली। ते पुढिलीये समासीं फीटली ।
आतां वृत्ती सावध केली। पाहिजे श्रोतीं ॥ २५॥
पैस अवकाश आकाश। कांहींच नाहीं जें भकास ।
तये निर्मळीं वायोस। जन्म जाला ॥ २६॥
वायोपासून जाला वन्ही। वन्हीपासुनी जालें पाणी ।
ऐसी जयाची करणी। अघटित घडली ॥ २७॥
उदकापासून सृष्टि जाली। स्तंभेविण उभारली ।
ऐसी विचित्र कळा केली। त्या नाव देव ॥ २८॥
देवें निर्मिली हे क्षिती। तीचे पोटीं पाषाण होती ।
तयासचि देव म्हणती। विवेकहीन ॥ २९॥
जो सृष्टिनिर्माणकर्ता। तो ये सृष्टीपुर्वी होता ।
मग हे तयाची सत्ता। निर्माण जाली ॥ ३०॥
कुल्लाळ पात्रापुर्वी आहे। पात्रें कांहीं कुल्लाळ नव्हे ।
तैसा देव पूर्वींच आहे। पाषाण नव्हे सर्वथा ॥ ३१॥
मृत्तिकेचें शैन्य केलें। कर्ते वेगळे राहिले ।
कार्यकारण येक केलें। तरी होणार नाहीं ॥ ३२॥
तथापि होईल पंचभूतिक। निर्गुण नव्हे कांहीं येक ।
कार्याकारणाचा विवेक। भूतांपरता नाहीं ॥ ३३॥
अवघी सृष्टि जो कर्ता। तो ते सृष्टीहूनि पर्ता ।
तेथें संशयाची वार्ता। काढूंचि नये ॥ ३४॥
खांसूत्रींची बाहुली। जेणें पुरुषें नाचविली ।
तोचि बाहुली हे बोली। घडे केवी ॥ ३५॥
छायामंडपीची सेना। सृष्टिसारिखीच रचना ।
सूत्रें चाळी परी तो नाना। वेक्ति नव्हे ॥ ३६॥

तैसा सृष्टिकर्ता देव। परी तो नव्हे सृष्टिभाव ।
जेणें केले नाना जीव। तो जीव कैसेनी ॥ ३७॥
जें जें जया करणें पडे। तें तें तो हें कैसें घडे ।
म्हणोनि वायांचि बापुडे। संदेहीं पडती ॥ ३८॥
सृष्टि ऐसेंचि स्वभावें। गोपुर निर्मिलें बरवें ।
परी तो गोपुर कर्ता नव्हे। निश्चयेसीं ॥ ३९॥
तैसें जग निर्मिलें जेणें। तो वेगळा पूर्णपणें ।
येक म्हणती मूर्खपणें। जग तोचि जगदीश ॥ ४०॥
एवं जगदीश तो वेगळा। जग निर्माण त्याची कळा ।
तो सर्वांमधें परी निराळा। असोन सर्वी ॥ ४१॥
म्हणोनि भूतांचा कर्दमु। यासी अलिप्त आत्मारामु ।
अविद्यागुणें मायाभ्रमु। सत्यचि वाटे ॥ ४२॥
मायोपाधी जगडंबर। आहे सर्वहि साचार ।
ऐसा हा विपरीत विचार। कोठेंचि नाहीं ॥ ४३॥
म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा। सर्वांपर जो परमात्मा ।
अंतर्बाह्य अंतरात्मा। व्यापूनि असे ॥ ४४॥
तयास म्हणावें देव। येर हें अवघेंचि वाव ।
ऐसा आहे अंतर्भाव। वेदांतीचा ॥ ४५॥
पदार्थवस्तु नासिवंत। हें तों अनुभवास येत ।
याकारणें भगवंत। पदार्थावेगळा ॥ ४६॥
देव विमळ आणी अचळ। शास्त्रें बोलती सकळ ।
तया निश्चळास चंचळ। म्हणों नये सर्वथा ॥ ४७॥
देव आला देव गेला। देव उपजला देव मेला ।
ऐसें बोलतां दुरिताला। काय उणें ॥ ४८॥
जन्म मरणाची वार्ता। देवास लागेना सर्वथा ।
देव अमर ज्याची सत्ता। त्यासी मृत्यु कैसेनी ॥ ४९॥
उपजणें आणी मरणें। येणें जाणें दुःख भोगणें ।
हें त्या देवाचें करणें। तो कारण वेगळा ॥ ५०॥
अंतःकरण पंचप्राण। बहुतत्वीं पिंडज्ञान ।
यां सर्वांस आहे चळण। म्हणोनि देव नव्हेती ॥ ५१॥
येवं कल्पनेरहित। तया नाव भगवंत ।
देवपणाची मात। तेथें नाहीं ॥ ५२॥
तव शिष्यें आक्षेपिलें। तरी कैसें ब्रह्मांड केलें ।
कर्तेपण कारण पडिलें। कार्यामधें ॥ ५३॥
द्रष्टेपणें द्रष्टा दृश्यीं। जैसा पडे अनायांसीं ।
कर्तेपणे निर्गुणासी। गुण तैसे ॥ ५४॥
ब्रह्मांडकर्ता कवण। कैसी त्याची वोळखण ।
देव सगुण किं निर्गुण। मह निरोपावा ॥ ५५॥
येक म्हणती त्या ब्रह्मातें। इच्छामात्रें सृष्टिकर्ते ।
सृष्टिकर्ते त्यापर्ते। कोण आहे ॥ ५६॥
आतां असो हे बहु बोली। सकळ माया कोठून जाली ।
ते हे आतां निरोपिली। पाहिजे स्वामी ॥ ५७॥
ऐसें ऐकोनि वचन। वक्ता म्हणे सावधान ।
पुढिले समासीं निरूपण। सांगिजेल ॥ ५८॥
ब्रह्मीं माया कैसे जाली। पुढें असे निरोपिली ।
श्रोतीं वृत्ति सावध केली। पाहिजे आतां ॥ ५९॥
पुढें हेंचि निरूपण। विशद केलें श्रवण ।
जेणें होय समाधान। साधकांचें ॥ ६०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देवदर्शननाम समास पहिला ॥ १॥

---

समास दुसरा। : सूक्ष्मआशंकानिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
मागां श्रोतीं आक्षेपिलें। तें पाहिजे निरोपिलें ।
निरावेवीं कैसें जालें। चराचर ॥ १॥
याचें ऐसें प्रतिवचन। ब्रह्म जें कां सनातन ।
तेथें माया मिथ्याभान। विवर्तरूप भावे ॥ २॥
आदि येक परब्रह्म। नित्यमुक्त अक्रिय परम ।
तेथें अव्याकृत सूक्ष्म। जाली मूळमाया ॥ ३॥

॥ श्लोक ॥
आद्यमेकं परब्रह्म नित्यमुक्तमविक्रियम् ।
तस्य माया समावेशो जीवमव्याकृतात्मकम् ॥

आशंका ॥ येक ब्रह्मा निराकार। मुक्त अक्रिये निर्विकार ।
तेथें माया वोडंबर। कोठून आली ॥ ४॥
ब्रह्म अखंड निर्गुण। तेथें इच्छा धरी कोण ।
निर्गुणीं सगुणेंविण। इच्छा नाहीं ॥ ॥ ५॥
मुळीं असेचिना सगुण। म्हणौनि नामें निर्गुण ।
तेथें जालें सगुण। कोणेपरी ॥ ६॥
निर्गुणचि गुणा आलें। ऐसें जरीं अनुवादलें ।
लागों पाहे येणें बोलें। मूर्खपण ॥ ७॥
येक म्हणती निरावेव। करून अकर्ता तो देव ।
त्याची लीळा बापुडे जीव। काये जाणती ॥ ८॥
येक म्हणती तो परमात्मा। कोण जाणे त्याचा महिमा ।
प्राणी बापुडा जीवात्मा। काये जाणे ॥ ९॥
उगाच महिमा सांगती। शास्त्रार्थ अवघा लोपिती ।
बळेंचि निर्गुणास म्हणती। करूनि अकर्ता ॥ १०॥
मुळीं नाहीं कर्तव्यता। कोण करून अकर्ता ।
कर्ता अकर्ता हे वार्ता। समूळ मिथ्या ॥ ११॥
जें ठाईचें निर्गुण। तेथें कैचें कर्तेपण ।
तरी हे इच्छा धरी कोण। सृष्टिरचाव्याची ॥ १२॥
इच्छा परमेश्वराची। ऐसी युक्ती बहुतेकांची ।
परी त्या निर्गुणास इच्छा कैंची। हें कळेना ॥ १३॥
तरी हे इतुकें कोणें केलें। किंवा आपणचि जालें ।
देवेंविण उभारलें। कोणेपरी ॥ १४॥

देवेंविण जालें सर्व। मग देवास कैंचा ठाव ।
येथें देवाचा अभाव। दिसोन आला ॥ १५ ॥
देव म्हणे सृष्टिकर्ता। तरी येवं पाहे सगुणता ।
निर्गुणपणाची वार्ता। देवाची बुडाली ॥ १६ ॥
देव ठाईचा निर्गुण। तरी सृष्टिकर्ता कोण ।
कर्तेपणाचें सगुण। नासिवंत ॥ १७ ॥
येथें पडिले विचार। कैसें जालें सचराचर ।
माया म्हणों स्वतंतर तरी हेंहि विपरीत दिसे ॥ १८ ॥
माया कोणीं नाहीं केली। हे आपणचि विस्तारली ।
ऐसें बोलतां बुडाली। देवाची वार्ता ॥ १९ ॥
देव निर्गुण स्वतसिद्ध। त्यासी मायेसि काये समंध ।
ऐसें बोलतां विरुद्ध। दिसोन आलें ॥ २० ॥
सकळ कांहीं कर्तव्यता। आली मायेच्याचि माथां
तरी भक्तांस उद्धरिता। देव नाहीं कीं ॥ २१ ॥
देवेंविण नुस्ती माया। कोण नेईल विलया ।
आम्हां भक्तां सांभाळाया। कोणीच नाहीं ॥ २२ ॥
म्हणोनि माया स्वतंतर। ऐसा न घडे कीं विचार ।
मायेस निर्मिता सर्वेश्वर। तो येकचि आहे ॥ २३ ॥
तरी तो कैसा आहे ईश्वर। मायेचा कैसा विचार ।
तरी हें आतां सविस्तर। बोलिलें पाहिजे ॥ २४ ॥
श्रोतां व्हावें सावधान। येकाग्र करूनियां मन ।
आतां कथानुसंधान। सावध ऐका ॥ २५ ॥
येके आशंकेचा भाव। जनीं वेगळाले अनुभव ।
तेहि बोलिजेती सर्व। येथानुक्रमें ॥ २६ ॥
येक म्हणती देवें केली। म्हणोनि हे विस्तारली ।
देवास इछ्या नस्ती जाली। तरी हे माया कैंची ॥ २७ ॥
येक म्हणती देव निर्गुण। तेथें इछ्या करी कोण ।
माया मिथ्या हे आपण। जालीच नाही ॥ २८ ॥
येक म्हणती प्रत्यक्ष दिसे। तयेसी नाहीं म्हणतां कैसें ।
माया हे अनादि असे। शक्ती ईश्वराची ॥ २९ ॥
येक म्हणती साच असे। तरी हे ज्ञानें कैसी निरसे ।
साचासारिखीच दिसे। परी हे मिथ्या ॥ ३० ॥
येक म्हणती मिथ्या स्वभावें। तरी साधन कासया करावें ।
भक्तिसाधन बोलिलें देवें। मायात्यागाकारणें ॥ ३१ ॥
येक म्हणती मिथ्या दिसतें। भयें अज्ञानसन्येपातें ।
साधन औषधही घेईजेतें। परी तें दृश्य मिथ्या ॥ ३२ ॥
अनंत साधनें बोलिलीं। नाना मतें भांबावलीं ।
तरी माया न वचे त्यागिली। मिथ्या कैसी म्हणावी ॥ ३३ ॥
मिथ्या बोले योगवाणी। मिथ्या वेदशास्त्रीं पुराणीं ।
मिथ्या नाना निरूपणीं। बोलिली माया ॥ ३४ ॥
माया मिथ्या म्हणतां गेली। हे वार्ता नाहीं ऐकिली ।
मिथ्या म्हणतांच लागली। समागमें ॥ ३५ ॥
जयाचे अंतरीं ज्ञान। नाहीं वोळखिले सज्जन ।
तयास मिथ्याभिमान। सत्यचि वाटे ॥ ३६ ॥
जेणें जैसा निश्चये केला। तयासी तैसाचि फळला ।
पाहे तोचि दिसे बिंबला। तैसी माया ॥ ३७ ॥
येक म्हणती माया कैंची। आहे ते सर्व ब्रह्मचि ।
थिजल्या विघुरल्या घृताची। ऐक्यता न मोडे ॥ ३८ ॥
थिजलें आणी विघुरलें। हें स्वरूपीं नाहीं बोलिलें ।
साहित्य भंगलें येणें बोलें। म्हणती येक ॥ ३९ ॥
येक म्हणती सर्व ब्रह्म। हें न कळे जयास वर्म ।
तयाचें अंतरींचा भ्रम। गेलाच नाहीं ॥ ४० ॥
येक म्हणती येकचि देव। तेथें कैंचें आणिलें सर्व ।
सर्व ब्रह्म हें अपूर्व। आश्चिर्य वाटे ॥ ४१ ॥
येक म्हणती येकचि खरें। आनुहि नाहीं दुसरें ।
सर्व ब्रह्म येणें प्रकारें। सहजचि जालें ॥ ४२ ॥
सर्व मिथ्या येकसरें। उरलें तेंचि ब्रह्म खरें ।
ऐसीं वाक्यें शास्त्राधारें। बोलती येक ॥ ४३ ॥
आळंकार आणी सुवर्ण। तेथें नाहीं भिन्नपण ।
आटाआटी वेर्थ सीण। म्हणती येक ॥ ४४ ॥
हीन उपमा येकदेसी। कैसी साहेल वस्तूसी ।
वर्णवेक्ती अव्यक्तासी। साम्यता न घडे ॥ ४५ ॥
सुवर्णीं दृष्टी घालितां। मुळीच आहे वेक्तता ।
आळंकार सोनें पाहतां सोनेंचि असे ॥ ४६ ॥
मुळीं सोनेंचि हें वेक्त। जड येकदेसी पीत ।
पूर्णास अपूर्णाचा दृष्टांत। केवीं घडे ॥ ४७ ॥
दृष्टांत तितुका येकदेसी। देणें घडे कळायासी ।
सिंधु आणी लहरीसी। भिन्नत्व कैंचें ॥ ४८ ॥
उत्तम मधेम कनिष्ठ। येका दृष्टांतें कळे पष्ट ।
येका दृष्टांतें नष्ट। संदेह वाढे ॥ ४९ ॥
कैंचा सिंधु कैंची लहरी। अचळास चळाची सरी ।
साचा ऐसी वोडंबरी। मानूंच नये ॥ ५० ॥
वोडंबरी हे कल्पना। नाना भास दाखवी जना ।
येरवी हे जाणा। ब्रह्मचि असे ॥ ५१ ॥
ऐसा वाद येकमेकां। लागतां राहिली आशंका ।
तेचि आतां पुढें ऐका। सावध होऊनी ॥ ५२ ॥
माया मिथ्या कळों आली। परी ते ब्रह्मीं कैसी जाली ।
म्हणावी ते निर्गुणें केली। तरी ते मुळींच मिथ्या ॥ ५३ ॥
मिथ्या शब्दीं कांहींच नाहीं। तेथें केलें कोणें काई ।
करणें निर्गुणाचा ठाई। हेंहि अघटित ॥ ५४ ॥
कर्ता ठाईचा अरूप। केलें तेंहि मिथ्यारूप ।
तथापी फेडूं आक्षेप। श्रोतयांचा ॥ ५५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सूक्ष्मआशंकानिरूपण समास दुसरा ॥ २ ॥

---

समास तिसरा। :। सूक्ष्मआशंकानिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥

अरे जे जालेंचि नाहीं। त्याची वार्ता पुससी काई ।
तथापि सांगों जेणें कांहीं। संशय नुरे ॥ १॥
दोरीकरितां भुजंग। जळाकरितां तरंग ।
मार्तंडाकरितां चांग। मृगजळ वाहे ॥ २॥
कल्पेनिकरितां स्वप्न दिसे। सिंपीकरितां रुपें भासे ।
जळाकरितां गार वसे। निमिष्य येक ॥ ३॥
मातीकरितां भिंती जाली। सिन्धुकरितां लहरी आली ।
तिळाकरितां पुतळी। दिसों लागे ॥ ४॥
सोन्याकरितां अळंकार। तंतुकरितां जालें चीर ।
कासवाकरितां विस्तार। हातापायांचा ॥ ५॥
तूप होतें तरी थिजलें। तरीकरितां मीठ जालें ।
बिंबाकरितां बिंबलें। प्रतिबिंब ॥ ६॥
पृथ्वीकरितां जालें झाड। झाडाकरितां छ्याया वाड ।
धातुकरितां पवाड। उंच नीच वर्णाचा ॥ ७॥
आतां असो हा दृष्टांत। अद्वैतास कैंचें द्वैत ।
द्वैतेंविण अद्वैत। बोलतांच न ये ॥ ८॥
भासाकरितां भास भासे। दृश्याकरितां अदृश्य दिसे ।
अदृश्यास उपमा नसे। म्हणोनि निरोपम ॥ ९॥
कल्पेनेविरहित हेत। दृश्यावेगळा दृष्टांत ।
द्वैतावेगळें द्वैत। कैसें जालें ॥ १०॥
विचित्र भगवंताची करणी। वर्णवेना सहस्त्रफणी ।
तेणें केली उभवणी। अनंत ब्रह्मांडाची ॥ ११॥
परमात्मा परमेश्वरु। सर्वकर्ता जो ईश्वरू ।
तयापासूनि विस्तारु। सकळ जाला ॥ १२॥
ऐसीं अनंत नामें धरी। अनंत शक्ती निर्माण करी ।
तोचि जाणावा चतुरीं। मूळपुरुष ॥ १३॥
त्या मूळपुरुषाची वोळखण। ते मूळमायाचि आपण ।
सकळ कांहीं कर्तेपण। तेथेंचि आलें ॥ १४॥

॥ श्लोक ॥
कार्यकारण कर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ॥

हे उघड बोलतां न ये। मोडों पाहातो उपाये ।
येरवीं हें पाहतां काय। साच आहे ॥ १५॥
देवापासून सकळ जालें। हें सर्वांस मानलें ।
परी त्या देवास वोळखिलें। पाहिजे कीं ॥ १६॥
सिद्धांचे जें निरूपण। जें साधकांस न मने जाण ।
पक्व नाहीं अंतःकर्ण। म्हणोनियां ॥ १७॥
अविद्यागुणें बोलिजे जीव। मायागुणें बोलिजे शिव ।
मूळमाया गुणें देव। बोलिजेतो ॥ १८॥
म्हणौनि कारण मूळमाया। अनंत शक्ती धरावया ।
तेथीचा अर्थ जाणावया। अनुभवी पाहिजे ॥ १९॥
मूळमाया तोचि मूळपुरुष। तोचि सर्वांचा ईश ।
अनंतनामी जगदीश। तयासीचि बोलिजे ॥ २०॥
अवघी माया विस्तारली। परी हे निशेष नाथिली ।
ऐसिया वचनाची खोली। विरुळा जाणे ॥ २१॥
ऐसें अनुर्वाच्य बोलिजे। परी हें स्वानुभवें जाणिजे ।
संतसंगेविण नुमजे। कांही केल्यां ॥ २२॥
माया तोचि मूळपुरुष। साधकां न मने हें निशेष ।
परी अनंतनामी जगदीश। कोणास म्हणावें ॥ २३॥
नामरूप माये लागलें। तरी हें बोलणें नीटचि जालें ।
येथें श्रोतीं अनुमानिलें। कासयासी ॥ २४॥
आतां असो हे सकळ बोली। मागील आशंका राहिली ।
निराकारीं कैसी जाली। मूळमाया ॥ २५॥
दृष्टीबंधन मिथ्या सकळ। परी तो कैसा जाला खेळ ।
हेंचि आतां अवघें निवळ। करून दाऊं ॥ २६॥
आकाश असतां निश्चळ। मधें वायो जाला चंचळ ।
तैसी जाणावी केवळ। मूळमाया ॥ २७॥
रूप वायोचें जालें। तेणें आकाश भंगलें ।
ऐसें हें सत्य मानलें। नवचे किं कदा ॥ २८॥
तैसी मूळमाया जाली। आणी निर्गुणता संचली ।
येणें दृष्टांतें तुटली। मागील आशंका ॥ २९॥
वायु नव्हता पुरातन। तैसी मूळमाया जाण ।
साच म्हणतां पुन्हा लीन। होतसे ॥ ३०॥
वायो रूपें कैसा आहे। तैसी मूळमाया पाहें ।
भासे परी तें न लाहे। रूप तयेचें ॥ ३१॥
वायो सत्य म्हणो जातां। परी तो न ये दाखवितां ।
तयाकडे पाहों जातां। धुळीच दिसे ॥ ३२॥
तैसी मूळमाया भासे। भासी परी ते न दिसे ।
पुढें विस्तारली असे। माया अविद्या ॥ ३३॥
जैसें वायोचेनि योगें। दृश्य उडे गगनमार्गें ।
मूळमायेच्या संयोगें। तैसें जग ॥ ३४॥
गगनीं आभाळ नाथिलें। अकस्मात उद्भवलें ।
मायेचेनि गुणें जालें। तैसें जग ॥ ३५॥
नाथिलेंचि गगन नव्हतें। अकस्मात आलें तेथें ।
तैसें दृश्य जालें येथें। तैसियापरी ॥ ३६॥
परी त्या आभाळाकरितां। गगनाची गेली निश्चळता ।
वाटे परी ते तत्वता। तैसीच आहे ॥ ३७॥
तैसें मायेकरितां निर्गुण। वाटे जालें सगुण ।
परी तें पाहतां संपूर्ण। जैसें तैसें ॥ ३८॥
आभाळ आले आणि गेलें। तरी गगन तें संचलें ।
तैसें गुणा नाहीं आलें। निर्गुण ब्रह्म ॥ ३९॥
नभ माथा लागलें दिसे। परी तें जैसें तैसें असे ।
तैसें जाणावें विश्वासें। निर्गुण ब्रह्म ॥ ४०॥
ऊर्ध पाहातां आकाश। निळिमा दिसे सावकास ।
परि तो जाणिजे मिथ्याभास। भासलासे ॥ ४१॥

आकाश पालथें घातलें। चहूंकडे आटोपलें ।
वाटे विश्वास कोंडिले। परी तें मोकळेचि असे ॥ ४२॥
पर्वतीं निळा रंग दिसे। परी तो तया लागला नसे ।
अलिप्त जाणावे तैसें। निर्गुण ब्रह्म ॥ ४३॥
रथ धावतां पृथ्वी चंचळ। वाटे परी ते असे निश्चळ ।
तैसें परब्रह्म केवळ। निर्गुण जाणावें ॥ ४४॥
आभाळाकरितां मयंक। वाटे धावतो निशंक ।
परी तें अवघें माईक। आभाळ चळे ॥ ४५॥
झळे अथवा अग्निज्वाळ। तेणें कंपित दिसे अंत्राळ ।
वाटे परी तें निश्चळ। जैसें तैसें ॥ ४६॥
तैसें स्वरूप हें संचलें। असतां वाटे गुणा आलें ।
ऐसें कल्पनेसि गमलें। परी ते मिथ्या ॥ ४७॥
दृष्टिबंधनाचा खेळ। तैसी माया हे चंचळ ।
वस्तु शाश्वत निश्चळ। जैसी तैसी ॥ ४८॥
ऐसी वस्तु निरावेव। माया दाखवी अवेव ।
ईचा ऐसा स्वभाव। नाथिलीच हे ॥ ४९॥
माया पाहातां मुळीं नसे। परी हे साचा ऐसी भासे ।
उद्भवे आणि निरसे। आभाळ जैसें ॥ ५०॥
ऐसी माया उद्भवली। वस्तु निर्गुण संचली ।
अहं ऐसी स्फुर्ति जाली। तेचि माया ॥ ५१॥
गुणमायेचे पवाडे। निर्गुणीं हें कांहींच न घडे ।
परी हें घडे आणी मोडे। सस्वरूपीं ॥ ५२॥
जैसी दृष्टी तरळली। तेणें सेनाच भासली ।
पाहातां आकाशींच जाली। परी ते मिथ्या ॥ ५३॥
मिथ्या मायेचा खेळ। उद्भव बोलिला सकळ ।
नानातत्वांचा पाल्हाळ। सांडूनियां ॥ ५४॥
तत्वें मुळींच आहेती। वोंकार वायोची गती ।
तेथीचा अर्थ जाणती। दक्ष ज्ञानी ॥ ५५॥
मूळमायेचे चळण। तेंचि वायोचें लक्षण ।
सूक्ष्म तत्वें तेंचि जाण। जडत्वा पावलीं ॥ ५६॥
ऐसीं पंचमाहांभूतें। पूर्वीं होती अवेक्तें ।
पुढें जालीं वेक्तें। सृष्टिरचनेसी ॥ ५७॥
मूळमायेचें लक्षण। तेंचि पंचभूतिक जाण ।
त्याची पाहें वोळखण। सूक्ष्मदृष्टीं ॥ ५८॥
आकाश वायोविण। इछ्याशब्द करी कोण ।
इछाशक्ती तेचि जाण। तेजस्वरूप ॥ ५९॥
मृदपण तेचि जळ। जडत्व पृथ्वी केवळ ।
ऐसी मूळमाया सकळ। पंचभूतिक जाणावी ॥ ६०॥
येक येक भूतांपोटीं। पंचभूतांची राहाटी ।
सर्व कळे सूक्ष्मदृष्टी। घालून पाहातां ॥ ६१॥
पुढें जडत्वास आलीं। तरी असतीं कालवलीं ।
ऐसी माया विस्तारली। पंचभूतिक ॥ ६२॥
मूळमाया पाहातां मुळीं। अथवा अविद्या भूमंडळीं ।
स्वर्ग्य मृत्य पाताळीं। पांचचि भूतें ॥ ६३॥

॥ श्लोक ॥
स्वर्गे मृत्यौ पाताले वा यत्किंचित्सचराचरं ।
सर्वपंचभूतकं राम षष्टें किंचिन्न दृश्यते ॥

सत्य स्वरूप आदिअंतीं। मध्यें पंचभूतें वर्तती ।
पंचभूतिक जाणिजे श्रोतीं। मूळमाया ॥ ६४॥
येथें उठिली आशंका। सावध होऊन ऐका ।
पंचभूतें जालीं येका। तमोगुणापासुनी ॥ ६५॥
मूळमाया गुणापरती। तेथें भूतें कैंचि होतीं ।
ऐसी आशंका हे श्रोतीं। घेतली असे ॥ ६६॥
ऐसें श्रोतीं आक्षेपिलें। संशयास उभें केलें ।
याचें उत्तर दिधलें। पुढिले समासीं ॥ ६७॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सूक्ष्मआशंकानाम समास तिसरा ॥ ३॥

---

## समास चवथा। :। सूक्ष्मपंचभूतेंनिरूपण

। । । । ॥ श्रीराम ॥
मागील आशंकेचें मूळ। आतां होईल प्रांजळ ।
वृत्ति करावी निवळ। निमिष्य येक ॥ १॥
ब्रह्मीं मूळमाया जाली। तिच्या पोटा माया आली ।
मग ते गुणा प्रसवली। म्हणौनि गुणक्षोभिणी ॥ २॥
पुढें तिजपासाव कोण। सत्वरजतमोगुण ।
तमोगुणापासून निर्माण। जाली पंचभूतें ॥ ३॥
ऐसीं भूतें उद्भवलीं। पुढें तत्वें विस्तारलीं ।
एवं तमोगुणापासून जालीं। पंचमाहांभूतें ॥ ४॥
मूळमाया गुणापरती। तेथें भूतें कैंचीं होतीं ।
ऐसी आशंका हे श्रोतीं। घेतली मागां ॥ ५॥
आणिक येक येके भूतीं। पंचभूतें असती ।
ते हि आतां कैसी स्थिती। प्रांजळ करूं ॥ ६॥
सूक्ष्मदृष्टीचें कौतुक। मूळमाया पंचभूतिक ।
श्रोतीं विमळ विवेक। केला पाहिजे ॥ ७॥
आधीं भूतें तीं जाणावीं। रूपें कैसीं वोळखावी ।
मग तें शोधून पाहावीं। सूक्ष्मदृष्टीं ॥ ८॥
वोळखी नाही अंतरी। ते वोळखावी कोणेपरी ।
म्हणोनि भूतांची वोळखी चतुरीं। नावेक परिसावी ॥ ९॥
जें जें जड आणी कठिण। तें तें पृथ्वीचें लक्षण ।
मृद आणी वोलेपण। तितुकें आप ॥ १०॥
जें जें उष्ण आणी सतेज। तें तें जाणावें पैं तेज ।
आतां वायोहि सहज। निरोपिजेल ॥ ११॥
चैतन्य आणी चंचळ। तो हा वायोचि केवळ ।
सून्य आकाश निश्चळ। आकाश जाणावें ॥ १२॥

ऐसीं पंचमाहांभूतें। वोळखी धरावी संकेतें ।
आतां येकीं पांच भूतें। सावध ऐका ॥ १३॥
जें त्रिगुणाहूनि पर। त्याचा सूक्ष्म विचार ।
यालागीं अति तत्पर। होऊन ऐका ॥ १४॥
सूक्ष्म आकाशीं कैसी पृथ्वी। तेचि आधीं निरोपावी ।
येथें धारणा धरावी। श्रोतेजनीं ॥ १५॥
आकाश म्हणजे अवकाश सून्य। सून्य म्हणिजे तें अज्ञान ।
अज्ञान म्हणिजे जडत्व जाण। तेचि पृथ्वी ॥ १६॥
आकाश स्वयें आहे मृद। तेंचि आप स्वतसिद्ध ।
आतां तेज तेंहि विशद। करून दाऊं ॥ १७॥
अज्ञानें भासला भास। तोचि तेजाचा प्रकाश ।
आतां वायो सावकाश। साकल्य सांगों ॥ १८॥
वायु आकाश नाहीं भेद। आकाशाइतुका असे स्तब्ध ।
तथापी आकाशीं जो निरोध। तोचि वायो ॥ १९॥
आकाशीं आकाश मिसळलें। हें तों नलगे किं बोलिलें ।
येणें प्रकारें निरोपिलें। आकाश् पंचभूत ॥ २०॥
वायोमध्यें पंचभूतें। तेंहि ऐका येकचित्तें ।
बोलिजेती ते समस्तें। येथान्वयें ॥ २१॥
हळु फूल तरी जड। हळु वारा तरी निबिड ।
वायो लागतां कडाड। मोडती झाडें ॥ २२॥
तोलेंविण झाड मोडे। ऐसें हें कहिंच न घडे ।
तोल तोचि तये जडे। पृथ्वीचा अंश ॥ २३॥
येथें श्रोते आशंका घेती। तेथें कैचीं झाडें होतीं ।
झाडें नव्हतीं तरी शक्ती। कठिणरूप आहे ॥ २४॥
वन्हीस्फुलींग लाहान। कांहीं तऱ्ही असे उष्ण ।
तैसें सुक्ष्मीं जडपण। सूक्ष्मरूपें ॥ २५॥
मृदपण तेंचि आप। भास तेजाचें स्वरूप ।
वायो तेथें चंचळरूप। सहजचि आहे ॥ २६॥
सकळांस मिळोन आकाश। सहजचि आहे अवकाश ।
पंचभूतांचे अंश। वायोमधें निरोपिले ॥ २७॥
आतां तेजाचें लक्षण। भासलेंपण तें कठीण ।
तेजीं ऐसी वोळखण। पृथ्वीयेची ॥ २८॥
भासला भास वाटे मृद। तेजीं आप तेचि प्रसिद्ध ।
तेजीं तेज स्वतसिद्ध। सांगणेंचि नलगे ॥ २९॥
तेजीं वायो तो चंचळ। तेजीं आकाश निश्चळ ।
तेजीं पंचभूतें सकळ। निरोपिलीं ॥ ३०॥
आतां आपाचें लक्षण। आप तेंचि जें मृदपण ।
मृदपण तें कठिण। तेचि पृथ्वी ॥ ३१॥
आपीं आप सहजचि असे। तेज मृदपणें भासे ।
वायो स्तब्धपणें दिसे। मृदत्वाआंगी ॥ ३२॥
आकाश न लगे सांगावें। तें व्यापकचि स्वभावें ।
आपीं पंचभूतांचीं नांवें। सूक्ष्म निरोपिलीं ॥ ३३॥
आतां पृथ्वीचें लक्षण। कठीण पृथ्वी आपण ।
कठिणत्वीं मृदपण। तेंचि आप ॥ ३४॥
कठिणत्वाचा जो भास। तोचि तेजाचा प्रकाश ।
कठिणत्वीं निरोधांश। तोचि वायो ॥ ३५॥
आकश सकळांस व्यापक। हा तों प्रगटचि विवेक ।
आकाशींच कांहीं येक। भास भासे ॥ ३६॥
आकाश तोडितां तुटेना। आकाश फोडितां फुटेना ।
आकाश परतें होयेना। तिळमात्र ॥ ३७॥
असो आतां पृथ्वीअंत। दाविला भूतांचा संकेत ।
येक भूतीं पंचभूत। तेंहि निरोपिलें ॥ ३८॥
परी हें आहाच पाहातां नातुडे। बळेंचि पोटीं संदेह पडे ।
भ्रांतिरूपें अहंता चढे। अकस्मात ॥ ३९॥
सूक्ष्मदृष्टीनें पाहातां। वायोचि वाटे तत्वता ।
सूक्ष्म वायो शोधूं जातां। पंचभूतें दिसती ॥ ४०॥
एवं पंचभूतिक पवन। तेचि मूळमाया जाण ।
माया आणी सूक्ष्म त्रिगुण। तेहि पंचभूतिक ॥ ४१॥
भूतें गुण मेळविजे। त्यासी अष्टधा बोलिजे ।
पंचभूतिक जाणिजे। अष्टधा प्रकृति ॥ ४२॥
शोधून पाहिल्यावीण। संदेह धरणें मूर्खपण ।
याची पाहावी वोळखण। सूक्ष्मदृष्टीं ॥ ४३॥
गुणापासूनि भूतें। पावलीं पष्ट दशेतें ।
जडत्वा येऊन समस्तें। तत्वें जालीं ॥ ४४॥
पुढें तत्वविवंचना। पिंडब्रह्मांड तत्वरचना ।
बोलिली असे ते जना। प्रगटचि आहे ॥ ४५॥
हा भूतकर्दम बोलिला। सूक्ष्म संकेतें दाविला ।
ब्रह्मगोळ उभारला। तत्पूर्वीं ॥ ४६॥
या ब्रह्मांडापैलिकडिल गोष्टी। जैं जाली नव्हती सृष्टी ।
मूळमाया सूक्ष्मदृष्टीं। वोळखावी ॥ ४७॥
सप्तकंचुक प्रचंड। जालें नव्हतें ब्रह्मांड ।
मायेअविद्येचें बंड। ऐलिकडे ॥ ४८॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर। हा ऐलिकडिल विचार ।
पृथ्वी मेरु सप्त सागर। ऐलिकडे ॥ ४९॥
नाना लोक नाना स्थानें। चन्द्र सूर्य तारांगणें ।
सप्त द्वीपें चौदा भुवनें। ऐलिकडे ॥ ५०॥
शेष कूर्म सप्त पाताळ। येकविस स्वर्गें अष्ट दिग्पाळ ।
तेतिस कोटि देव सकळ। ऐलिकडे ॥ ५१॥
बारा आदित्य। अक्रा रुद्र। नव नाग सप्त ऋषेश्वर ।
नाना देवांचे अवतार। ऐलिकडे ॥ ५२॥
मेघ मनु चक्रवती। नाना जीवांची उत्पति ।
आतां असो सांगों किती। विस्तार हा ॥ ५३॥
सकळ विस्ताराचें मूळ। ते मूळ मायाच केवळ ।
मागां निरोपिली सकळ। पंचभूतिक ॥ ५४॥
सूक्ष्मभूतें जे बोलिलीं। तेचि पुढें जडत्वा आलीं ।
ते सकळहि बोलिलीं। पुढिले समासीं ॥ ५५॥

पंचभूतें पृथकाकारें। पुढें निरोपिलीं विस्तारें ।
वोळखीकारणें अत्यादरें। श्रोतीं श्रवण करावीं ॥ ५६॥
पंचभूतिक ब्रह्मगोळ। जेणें कळे हा प्रांजळ ।
दृश्य सांडून केवळ। वस्तुच पाविजे ॥ ५७॥
माहाद्वार वोलांडावें। मग देवदर्शन घ्यावें ।
तैसें दृश्य हे। सांडावें। जाणोनियां ॥ ५८॥
म्हणोनि दृश्याचा पोटीं। आहे पंचभूतांची दाटी ।
येकपणें पडिली मिठी। दृश्य पंचभूतां ॥ ५९॥
एवं पंचभूतांचेंचि दृश्य। सृष्टी रचली सावकास ।
श्रोतीं करून अवकाश। श्रवण करावें ॥ ६०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सूक्ष्मपंचभूतेंनिरूपणनाम समास चवथा ॥ ४॥

---

समास पांचवा। :। स्थूळपंचमहाभूतेंस्वरूपाकाशभेदोनाम
। । । । ॥ श्रीराम ॥
केवळ मूर्ख तें नेणे। म्हणौन घडलें सांगणे ।
पंचभूतांचीं लक्षणें। विशद करूनि ॥ १॥
पंचभूतांचा कर्दम जाला। आतां न वचे वेगळा केला ।
परंतु कांहीं येक वेगळाला। करून दाऊं ॥ २॥
पर्वत पाषाण शिळा शिखरें। नाना वर्णें लहान थोरें ।
खडे गुंडे बहुत प्रकारें। जाणिजे पृथ्वी ॥ ३॥
नाना रंगांची मृत्तिका। नाना स्थळोस्थळीं जे कां ।
वाळुकें वाळु अनेका। मिळोन पृथ्वी ॥ ४॥
पुरें पट्टणें मनोहरें। नाना मंदिरें दामोदरें ।
नाना देवाळयें शिखरें। मिळोन पृथ्वी ॥ ५॥
सप्त द्वीपावती पृथ्वी। काये म्हणोनि सांगावी ।
नव खंडे मिळोन जाणावी। वसुंधरा ॥ ६॥
नाना देव नाना नृपती। नाना भाषा नाना रिती ।
लक्ष चौऱ्यासी उत्पत्ती। मिळोन पृथ्वी ॥ ७॥
नाना उद्वसें जें वनें। नाना तरुवरांचीं बनें ।
गिरीकंदरें नाना स्थानें। मिळोन पृथ्वी ॥ ८॥
नाना रचना केली देवीं। जे जे निर्मिली मानवी ।
सकळ मिळोन पृथ्वी। जाणिजें श्रोतीं ॥ ९॥
नाना धातु सुवर्णादिक। नाना रत्नें जे अनेक ।
नाना काष्टवृक्षादिक। मिळोन पृथ्वी ॥ १०॥
आतां असो हें बहुवस। जडांश आणी कठिणांश ।
सकळ पृथ्वी हा विश्वास। मानिला पाहिजे ॥ ११॥
बोलिलें पृथ्वीचे रूप। आतां सांगिजेल आप ।
श्रोतीं वोळखावें रूप। सावध होऊनी ॥ १२॥
वापी कूप सरोवर। नाना सरितांचें जें नीर ।
मेघ आणी सप्त सागर। मिळोन आप ॥ १३॥
॥ श्लोकार्ध। क्षारक्षीरसुरासर्पिर्दधि इक्षुर्जलं तथा ॥
क्षारसमुद्र दिसताहे। सकळ जन दृष्टीस पाहे ।
जेथें लवण होताहे। तोचि क्षारसिंधु ॥ १४॥
येक दुधाचा सागर। त्या नाव क्षीरसागर ।
देवें दिधला निरंतर। उपमन्यासी ॥ १५॥
येक समुद्र मद्याचा। येक जाणावा घृताचा ।
येक निखळ दह्याचा। समुद्र असे ॥ १६॥
येक उसाच्या रसाचा। येक तो शुद्ध जळाचा ।
ऐसा सातां समुद्राचा। वेढा पृथ्वीयेसी ॥ १७॥
एवं भूमंडळीचें जळ। नाना स्थळींचें सकळ ।
मिळोन अवघें केवळ। आप जाणावें ॥ १८॥
पृथ्वीगर्भीं कितीयेक। पृथ्वीतळीं आवर्णोदक ।
तिहीं लोकींचें उदक। मिळोन आप ॥ १९॥
नाना वल्ली बहुवस। नाना तरुवरांचे रस ।
मधु पारा अमृत विष। मिळोन आप ॥ २०॥
नाना रस स्नेहादिक। याहि वेगळे अनेक ।
जगावेगळे अवश्यक। आप बोलिजे ॥ २१॥
सारद्र आणी सीतळ। जळासारिखें पातळ ।
शुक्लीत शोणीत मूत्र लाळ। आप बोलिजे ॥ २२॥
आप संकेतें जाणावें। पातळ बोलें वोळखावें ।
मृद सीतळ स्वभावें। आप बोलिजे ॥ २३॥
जाला आपाचा संकेत। पातळ मृद गुळगुळित ।
स्वेद श्लेष्मा अश्रु समस्त। आप जाणावें ॥ २४॥
तेज ऐका सावधपणें। चंद्र सूर्य तारांगणें ।
दिव्य देह सतेजपणें। तेज बोलिजे ॥ २५॥
वन्ही मेघीं विद्युल्यता। वन्ही सृष्टी संव्हारिता ।
वन्ही सागरा जाळिता। वडवानळु ॥ २६॥
वन्ही शंकराचे नेत्रींचा। वन्ही काळाचे क्षुधेचा ।
वन्ही परीघ भूगोळाचा। तेज बोलिजे ॥ २७॥
जें जें प्रकाश रूप। तें तें तेजाचें स्वरूप ।
शोषक उष्णादि आरोप। तेज जाणावे ॥ २८॥
वायो जाणावा चंचळ। चैतन्य चेतवी केवळ ।
बोलणें चालणें सकळ। वायुमुळें ॥ २९॥
हाले डोले तितुका पवन। कांहीं न चले पवनेंविण ।
सृष्टी चाळाया कारण। मूळ तो वायो ॥ ३०॥
चळण वळण आणी प्रासारण। निरोध आणी अकोचन ।
सकळ जाणावा पवन। चंचळरूपी ॥ ३१॥
प्राण अपान आणी व्यान। चौथा उदान आणी समान ।
नाग कुर्म कर्कश जाण। देवदत्त धनंजये ॥ ३२॥
जितुकें कांहीं होतें चळण। तितुकें वायोचें लक्षण ।
चंद्र सूर्य तारांगण। वायोचि धर्ता ॥ ३३॥
आकाश जाणावें पोकळ। निर्मळ आणी निश्चळ ।
अवकाशरूप सकळ। आकाश जाणावें ॥ ३४॥
आकाश सकळांस व्यापक। आकाश अनेकीं येक ।
आकाशामध्यें कौतुक। चहूं भूतांचे ॥ ३५॥
आकाशा ऐसें नाहीं सार। आकाश सकळांहून थोर ।

पाहातां आकाशाचा विचार। स्वरूपासारिखा ॥ ३६॥
तव शिष्यें केला आक्षेप। दोहींचें सारखेंचि रूप ।
तरी आकाशचि स्वरूप। कां म्हणो नये ॥ ३७॥
आकाश स्वरुपा कोण भेद। पाहातां दिसेती अभेद ।
आकाश वस्तुच स्वतसिद्ध। कां न म्हणावी ॥ ३८॥
वस्तु अचळ अढळ। वस्तु निर्मळ निश्चळ ।
तैसेंचि आकाश केवळ। वस्तुसारिखें ॥ ३९॥
ऐकोनि वक्ता बोले वचन। वस्तु निर्गुण पुरातन ।
आकाशाआंगी सप्त गुण। शास्त्रीं निरोपिलें ॥ ४०॥
काम क्रोध शोक मोहो। भय अज्ञान सुन्यत्व पाहो ।
ऐसा सप्तविध स्वभाव। आकाशाचा ॥ ४१॥
ऐसें शात्राकारें बोलिलें। म्हणोनि आकाश भूत जालें ।
स्वरूप निर्विकार संचलें। उपमेरहित ॥ ४२॥
काचबंदि आणी जळ। सारिखेंच वाटे सकळ ।
परी येक काच येक जळ। शाहाणे जाणती ॥ ४३॥
रुवामधें स्फटिक पडिला। लोकीं तद्रूप देखिला ।
तेणें कपाळमोक्ष जाला। कापुस न करी ॥ ४४॥
तदुलामधें श्वेत खडे। तंदुलासारिखें वांकुडे ।
चाऊं जाता दांत पडे। तेव्हां कळे ॥ ४५॥
त्रिभागामधें खडा असे। त्रिभागासारिखाच भासे ।
शोधूं जातां वेगळा दिसे। कठिणपणें ॥ ४६॥
गुळासारिखा गुळदगड। परी तो कठिण निचाड ।
नागकांडी आणी वेखंड। येक म्हणो नये ॥ ४७॥
सोनें आणी सोनपितळ। येकचि वाटती केवळ ।
परी पितळेंसी मिळतां ज्वाळ। काळिमा चढे ॥ ४८॥
असो हे हीन दृष्टांत। आकाश म्हणिजे केवळ भूत ।
तें भूत आणी अनंत। येक कैसे ॥ ४९॥
वस्तुसी वर्णचि नसे। आकाश शामवर्ण असे ।
दोहींस साम्यता कैसे। करिती विचक्षण ॥ ५०॥
श्रोते म्हणती कैंचें रूप। आकाश ठांईचे अरूप ।
आकाश वस्तुच तद्रूप। भेद नाहीं ॥ ५१॥
चहूं भूतांस नाश आहे। आकाश कैसें नासताहे ।
आकाशास न साहे। वर्ण वेक्ती विकार ॥ ५२॥
आकाश अचळ दिसतें। त्याचें काये नासों पाहातें ।
पाहातां आमुचेनि मतें। आकाश शाश्वत ॥ ५३॥
ऐसे ऐकोन वचन। वक्ता बोले प्रतिवचन ।
ऐक आतां लक्षण। आकाशाचें ॥ ५४॥
आकाश तमापासून जालें। म्हणोन काम क्रोधें वेष्टिलें ।
अज्ञान सुन्यत्व बोलिलें। नाम तयाचें ॥ ५५॥
अज्ञानें कामक्रोधादिक। मोहो भये आणी शोक ।
हा अज्ञानाचा विवेक। आकाशागुणें ॥ ५६॥
नास्तिक नकारवचन। तें सुन्याचें लक्षण ।
तयास म्हणती ह्रुदयसुन्य। अज्ञान प्राणी ॥ ५७॥
आकाश स्तब्धपणें सुन्य। सुन्य म्हणिजे तें अज्ञान ।
अज्ञान म्हणिजे कठिण। रूप तयाचें ॥ ५८॥
कठिण सुन्य विकारवंत। तयास कैसें म्हणावें संत ।
मनास वाटे हें तद्वत। आहाच दृष्टीं ॥ ५९॥
अज्ञान कालवलें आकाशीं। तया कर्दमा ज्ञान नासी ।
म्हणोनिया आकाशासी। नाश आहे ॥ ६०॥
तैसें आकाश आणी स्वरूप। पाहातां वाटती येकरूप ।
परी दोहींमधें विक्षेप। सुन्यत्वाचा ॥ ६१॥
आहाच पाहातां कल्पेनिसी। सारिखेंच वाटे निश्चयेंसीं ।
परी आकाश स्वरूपासी। भेद नाही ॥ ६२॥
उन्मनी आणी सुषुप्ति अवस्ता। सारिखेच वाटे तत्वता ।
परी विवंचून पाहों जातां। भेद आहे ॥ ६३॥
खोटें खऱ्यासारिखें भाविती। परी परीक्षवंत निवडिती ।
कां कुरंगें देखोन भुलती। मृगजळासी ॥ ६४॥
आतां असो हा दृष्टांत। बोलिला कळाया संकेत ।
म्हणौनि भूत आणी अनंत। येक नव्हेती ॥ ६५॥
आकाश वेगळेपणें पाहावें। स्वरूपीं स्वरूपचि व्हावें ।
वस्तुचें पाहाणें स्वभावें। ऐसे असे ॥ ६६॥
येथें आशंका फिटली। संदेहवृत्ती मावळली ।
भिन्नपणें नवचे अनुभवली। स्वरूपस्थिती ॥ ६७॥
आकाश अनुभवा येतें। स्वरूप अनुभवापरतें ।
म्हणोनियां आकाशातें। साम्यता न घडे ॥ ६८॥
दुग्धासारिखा जळांश। निवडुं जाणती राजहंस ।
तैसें स्वरूप आणी आकाश। संत जाणती ॥ ६९॥
सकळ माया गथागोवी। संतसंगें हें उगवावी ।
पाविजे मोक्षाची पदवी। सत्समागमें ॥ ७०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
स्थूळपंचमहाभूतेंस्वरूपाकाशभेदोनाम समास पांचवा ॥ ५॥

---

समास सहावा। :। दुश्चीतनिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
श्रोता विनवी वक्तयासी। सत्संगाची महिमा कैसी ।
मोक्ष लाभे कितां दिवसीं। हें मज निरोपावें ॥ १॥
धरितां साधूची संगती। कितां दिवसां होते मुक्ती ।
हा निश्चय कृपामुर्ती। मज दिनास करावा ॥ २॥
मुक्ती लाभे तत्क्षणीं। विश्वासतां निरूपणीं ।
दुश्चितपणीं हानी। होतसे ॥ ३॥
सुचितपणें दुश्चीत। मन होतें अकस्मात ।
त्यास करावें निवांत। कोणे परीं ॥ ४॥
मनाच्या तोडून वोढी। श्रवणीं बैसावें आवडीं ।
सावधपणें घडीनें घडी। काळ सार्थक करावा ॥ ५॥
अर्थ प्रमेय ग्रंथांतरीं। शोधून घ्यावें अभ्यांतरीं ।
दुश्चीतपण आलें तरी। पुन्हां श्रवण करावें ॥ ६॥
अर्थांतर पाहिल्यावीण। उगेंचि करी जो श्रवण ।

तो श्रोता नव्हे पाषण। मनुष्यवेषें ॥ ७॥
येथें श्रोते मानितील सीण। आम्हांस केलें पाषाण ।
तरी पाषाणाचें लक्षण। सावध ऐका ॥ ८॥
वांकुडा तिकडा फोडिला। पाषाण घडून नीट केला ।
दुसरे वेळेसी पाहिला। तरी तो तैसाचि असे ॥ ९॥
टांकीनें खपली फोडिली। ते मागुती नाहीं जडली ।
मनुष्याची कुबुद्धि झाडिली। तरी ते पुन्हा लागे ॥ १०॥
सांगतां अवगुण गेला। पुन्हा मागुतां जडला ।
याकरणें माहांभला। पाषाणगोटा ॥ ११॥
ज्याचा अवगुण झडेना। तो पाषाणाहून उणा ।
पाषाण आगळा जाणा। कोटिगुणें ॥ १२॥
कोटिगुणें कैसा पाषाण। त्याचेंहि ऐका लक्षण ।
श्रोतीं करावें श्रवण। सावध होऊनी ॥ १३॥
माणीक मोतीं प्रवाळ। पाचि वैडुर्य वज्रनीळ ।
गोमेदमणी परिस केवळ। पाषाण बोलिजे ॥ १४॥
याहि वेगळे बहुत। सूर्यकांत सोमकांत ।
नाना मोहरे सप्रचित। औषधाकारणें ॥ १५॥
याहि वेगळे पाषाण भले। नाना तीर्थीं जे लागले ।
वापी कूप सेखीं जाले। हरिहरमुर्ती ॥ १६॥
याचा पाहातं विचार। पाषाणा ऐसें नाहीं सार ।
मनुष्य तें काये पामर। पाषाणापुढें ॥ १७॥
तरी तो ऐसा नव्हे तो पाषाण। जो अपवित्र निःकारण ।
तयासातिखा देह जाण। दुश्चीत अभक्तांचा ॥ १८॥
आतां असो हें बोलणें। घात होतो दुश्चीतपणें ।
दुश्चीतपणाचेनि गुणें। प्रपंच ना परमार्थ ॥ १९॥
दुश्चीतपणें कार्य नासे। दुश्चीतपणें चिंता वसे ।
दुश्चीतपणें स्मरण नसे। क्षण येक पाहातां ॥ २०॥
दुश्चीतपणें शत्रुजिणें। दुश्चीतपणें जन्ममरणें ।
दुश्चीतपणाचेनि गुणें। हानी होय ॥ २१॥
दुश्चीतपणें नव्हे साधन। दुश्चीतपणें न घडे भजन ।
दुश्चीतपणें नव्हे ज्ञान। साधकांसी ॥ २२॥
दुश्चीतपणें नये निश्चयो। दुश्चीतपणें न घडे जयो ।
दुश्चीतपणें होये क्षयो। आपुल्या स्वहिताचा ॥ २३॥
दुश्चीतपणें न घडे श्रवण। दुश्चीतपणें न घडे विवरण ।
दुश्चीतपणें निरूपण। हातींचे जाये ॥ २४॥
दुश्चीत बैसलाचि दिसे। परी तो असतचि नसे ।
चंचळ चक्रीं पडिलें असे। मानस तयाचें ॥ २५॥
वेडें पिशाच्य निरंतर। अंध मुके आणी बधिर ।
तैसा जाणावा संसार। दुश्चीत प्राणियांचा ॥ २६॥
सावध असोन उमजेना। श्रवण असोन ऐकेना ।
ज्ञान असोन कळेना। सारासारविचार ॥ २७॥
ऐसा जो दुश्चीत आळसी। परलोक कैंचा त्यासी ।
जयाचे जिवीं अहर्निशीं। आळस वसे ॥ २८॥
दुश्चीतपणापासुनि सुटला। तरी तो सवेंच आळस आला ।
आळसाहातीं प्राणीयांला। उसंतचि नाहीं ॥ २९॥
आळसें राहिला विचार। आळसें बुडाला आचार ।
आळसे नव्हे पाठांतर। कांहीं केल्यां ॥ ३०॥
आळसें घडेना श्रवण। आळसें नव्हें निरूपण ।
आळसें परमार्थाची खूण। मळिण जाली ॥ ३१॥
आळसें नित्यनेम राहिला। आळसें अभ्यास बुडाला ।
आळसें आळस वाढला। असंभाव्य ॥ ३२॥
आळसें गेली धारणा धृती। आळसें मळिण जाली वृत्ती ।
आळसें विवेकाची गती। मंद जाली ॥ ३३॥
आळसें निद्रा वाढली। आळसें वासना विस्तारली ।
आळसें सुन्याकार जाली। सद्बुद्धि निश्चयाची ॥ ३४॥
दुश्चीतपणासवें आळस। आळसें निद्राविळास ।
निद्राविळासें केवळ नास। आयुष्याचा ॥ ३५॥
निद्रा आळस दुश्चीतपण। हेंचि मूर्खाचें लक्षण ।
येणेंकरिता निरूपण। उमजेचिना ॥ ३६॥
हें तिन्ही लक्षणें जेथें। विवेक कैंचा असेल तेथें ।
अज्ञानास यापरतें। सुखचि नाहीं ॥ ३७॥
क्षुधां लागतांच जेविला। जेऊन उठतां आळस आला ।
आळस येतां निजेला। सावकास ॥ ३८॥
निजोन उठतांच दुश्चीत। कदा नाहीं सावचित ।
तेथें कैचें आत्महित। निरूपणीं ॥ ३९॥
मर्कटापासीं दिल्हें रत्न। पिशाच्याहातीं निधान ।
दुश्चीतापुढें निरूपण। तयापरी होये ॥ ४०॥
आतां असो हे उपपत्ती। आशंकेची कोण गती ।
कितां दिवसाइं होते मुक्ती। सज्जनाचेनि संगें ॥ ४१॥
ऐका याचें प्रत्योत्तर। कथेंसि व्हावें निरोत्तर ।
संतसंगाचा विचार। ऐसा असे ॥ ४२॥
लोहो परियेसी लागला। थेंबुटा सागरीं मिळाला ।
गंगे सरिते संगम जाला। तत्क्षणीं ॥ ४३॥
सावध साक्षपी आणी दक्ष। तयास तत्काळचि मोक्ष ।
इतरांस तें अलक्ष। लक्षिलें नवचे ॥ ४४॥
येथें शिष्यप्रज्ञाच केवळ। प्रज्ञावंतां नलगे वेळे ।
अनन्यास तत्काळ। मोक्ष लाभे ॥ ४५॥
प्रज्ञावंत आणी अनन्य। तयास नलगे येक क्षण ।
अनन्य भावार्थेंविण। प्रज्ञा खोटी ॥ ४६॥
प्रज्ञेविण अर्थ न कळे। विश्वासेंविण वस्तु ना कळे ।
प्रज्ञाविश्वासें गळे। देहाभिमान ॥ ४७॥
देहाभिमानाचे अंतीं। सहजचि वस्तुप्राप्ती ।
सत्संगें सद्गती। विलंबचि नाही ॥ ४८॥
सावध साक्षपी विशेष। प्रज्ञावंत आणी विश्वास ।
तयास साधनीं सायास। करणेंचि नलगे ॥ ४९॥
इतर भाविक साबडे। तयांसहि साधनें मोक्ष जोडे ।

साधुसंगें तत्काळ उडे। विवेकदृष्टी ॥ ५० ॥
परी तें साधन मोडुं नये। निरूपणाचा उपाये ।
निरूपणें लागे सोय। सर्वत्रांसी ॥ ५१ ॥
आतां मोक्ष आहे कैसा। कैसी स्वरूपाची दशा ।
त्याचे प्राप्तीचा भर्वसा। सत्संगें केवी ॥ ५२ ॥
ऐसें निरूपण प्रांजळ। पुढें बोलिलें असे सकळ ।
श्रोतीं होऊनियां निश्चळ। अवधान द्यावें ॥ ५३ ॥
अवगुण त्यागावयाकारणें। न्यायनिष्ठुर लागे बोलणें ।
श्रोतीं कोप न धरणें। ऐसिया वचनाचा ॥ ५४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
दुश्चीतनिरूपणनाम समास सहावा ॥

---

समास सातवा। :। मोक्षलक्षण
। । । । ॥ श्रीराम ॥
मागां श्रोतयांचा पक्ष। कितां दिवसां होतो मोक्ष ।
तेचि कथा श्रोते दक्ष। होऊन ऐका ॥ १ ॥
मोक्षास कैसें जाणावें। मोक्ष कोणास म्हणावें ।
संतसंगें पावावें। मोक्षास कैसें ॥ २ ॥
तरी बद्ध म्हणिजे बांधला। आणि मोक्ष म्हणिजे मोकळा जाला ।
तो संतसंगें कैसा लाधला। तेंचि ऐका ॥ ३ ॥
प्राणी संकल्पें बांधला। जीवपणें बद्ध जाला ।
तो विवेकें मुक्त केला। साधुजनीं ॥ ४ ॥
मी जीव ऐसा संकल्प। दृढ धरितां गेले कल्प ।
तेणें प्राणी जाला अल्प। देहबुद्धीचा ॥ ५ ॥
मी जीव मज बंधन। मज आहे जन्ममरण ।
केल्या कर्माचें फळ आपण। भोगीन आतां ॥ ६ ॥
पापाचें फळ तें दुःख। आणी पुण्याचें फळ तें सुख ।
पापपुण्य अवश्यक। भोगणें लागे ॥ ७ ॥
पापपुण्य भोग सुटेना। आणी गर्भवासहि तुटेना ।
ऐसी जयाची कल्पना। दृढ जाली ॥ ८ ॥
तया नाव बांधला। जीवपणें बद्ध जाला ।
जैसा स्वयें बांधोन कोसला। मृत्यु पावे ॥ ९ ॥
तैसा प्राणी तो अज्ञान। नेणें भगवंताचें ज्ञान ।
म्हणे माझें जन्ममरण। सुटेचिना ॥ १० ॥
आतां कांहीं दान करूं। पुढिलया जन्मास आधारु ।
तेणें सुखरूप संसारु। होईल माझा ॥ ११ ॥
पूर्वी दान नाहीं केलें। म्हणोन दरिद्र प्राप्त जालें ।
आतां तरी कांहीं केलें। पाहिजे कीं ॥ १२ ॥
म्हणौनी दिलें वस्त्र जुनें। आणी येक तांब्र नाणें ।
म्हणे आतां कोटिगुणें। पावेन पुढें ॥ १३ ॥
कुशावर्ती कुरुक्षेत्रीं। महिमा ऐकोन दान करी ।
आशा धरिली अभ्यांतरीं। कोटिगुणांची ॥ १४ ॥
रुका आडका दान केला। अतितास टुक्डा घातला ।
म्हणे माझा ढीग जाला। कोटि टुकड्यांचा ॥ १५ ॥
तो मी खाईन पुढिलिये जन्मीं। ऐसें कल्पीं अंतर्यामीं ।
वासना गुंतली जन्मकर्मीं। प्राणीयांची ॥ १६ ॥
आतां मी जें देईन। तें पुढिले जन्मीं पावेन ।
ऐसें कल्पी तो अज्ञान। बद्ध जाणावा ॥ १७ ॥
बहुतां जन्माचे अंतीं। होये नरदेहाची प्राप्ती ।
येथें न होतां ज्ञानें सद्गती। गर्भवस चुकेना ॥ १८ ॥
गर्भवास नरदेहीं घडे। ऐसें हें सर्वथा न घडे ।
अकस्मात भोगणें पडे। पुन्हा नीच योनी ॥ १९ ॥
ऐसा निश्चयो शास्त्रांतरीं। बहुतीं केला बहुतांपरीं ।
नरदेह संसारीं। परम दुल्लभ असे ॥ २० ॥
पापपुण्य समता घडे। तरीच नरदेह जोडे ।
येरवीं हा जन्म न घडे। हें व्यासवचन भागवतीं ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥
नरदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं। प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारं ।
मायानुकुलेन नभस्वतेरितं। पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥

नरदेह दुल्लभ। अल्प संकल्पाचा लाभ ।
गुरु कर्णधारी स्वयंभ। सुख पाववी ॥ २२ ॥
दैव अनुकुळ नव्हे जया। स्वयें पापी तो प्राणीया ।
भवब्धी न तरवे तया। आत्महत्यारा बोलिजे ॥ २३ ॥
ज्ञानेंविण प्राणीयांसी। जन्ममृत्य लक्ष चौऱ्यासी ।
तितुक्या आत्महत्या त्यासी। म्हणोन आत्महत्यारा ॥ २४ ॥
नरदेहीं ज्ञानेंविण। कदा न चुके जन्ममरण ।
भोगणें लागती दारुण। नाना नीच योनी ॥ २५ ॥
रीस मर्कट श्वान सूकर। अश्व वृषभ म्हैसा खर ।
काक कुर्कूट जंबुक मार्जर। सरड बेडुक मक्षिका ॥ २६ ॥
इत्यादिक नीच योनी। ज्ञान नस्तां भोगणें जनीं ।
आशा धरी मुर्ख प्राणी ॥ पुढिलिया जन्माची ॥ २७ ॥
हा नरदेह पडतां। तोंचि पाविजे मागुतां ।
ऐसा विश्वास धरिजां। लाज नाहीं ॥ २८ ॥
कोण पुण्याच संग्रहोओ। जे पुन्हा पाविजे नरदेहो ।
दुराशा धरिली पाहो। पुढिलिया जन्माची ॥ २९ ॥
ऐसा मुर्ख अज्ञान जन। केलें संकल्पें बंधन ।
शत्रु आपणासि आपण। होऊन ठेला ॥ ३० ॥

॥ श्लोक ॥
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।

ऐसे संकल्पाचें बंधन। संतसंगे तुटे जाण ।
ऐक तयाचें लक्षण। सांगिजेल ॥ ३१ ॥
पांचा भूतांचें शरीर। निर्माण जालें सचराचर ।

प्रकृतिस्वभावें जगदाकार। वर्तों लागे ॥ ३२॥
देह अवस्ता अभिमान। स्थानें भोग मात्रा गुण ।
शक्ती आदिकरुन लक्षण। चौपुटी तत्वांचें ॥ ३३॥
ऐसी पिंडब्रह्मांड रचना। विस्तारें वाढली कल्पना ।
निर्धारितां तत्वज्ञाना। मतें भांबावलीं ॥ ३४॥
नाना मतीं नाना भेद। भेदें वाढती वेवाद ।
परी तो ऐक्यतेचा संवाद। साधु जाणती ॥ ३५॥
तया संवादाचे लक्षण। पंचभूतिक देह जाण ।
त्या देहामधें कारण। आत्मा वोळखावा ॥ ३६॥
देह अंती नासोन जाये। त्यास आत्मा म्हणों नये ।
नाना तत्वांचा समुदाय। देहामधें आला ॥ ३७॥
अंतःकर्ण प्राणादिक। विषये इंद्रियें दशक ।
हा सूक्ष्माच विवेक। बोलिला शास्त्रीं ॥ ३८॥
घेतां सूक्ष्माची शुद्धी। भिन्न अंतःकरण मन बुद्धी ।
नाना तत्वांचे उपाधी। वेगळा आत्मा ॥ ३९॥
स्थूळ सूक्ष्म कारण। माहाकारण विराट हिरण्य ।
अव्याकृत मूळप्रकृति जाण। ऐसे अष्टदेह ॥ ४०॥
च्यारी पिंडी च्यारी ब्रह्मांडीं। ऐसी अष्टदेहाची प्रौढी ।
प्रकृती पुरुषांची वाढी। दशदेह बोलिजे ॥ ४१॥
ऐसें तत्वांचे लक्षण। आत्मा साक्षी विलक्षण ।
कार्य कर्ता कारण। दृश्या तयाचें ॥ ४२॥
जीवशिव पिंडब्रह्मांड। मायेअविद्येचें बंड ।
हें सांगता असे उदंड। परी आत्मा तो वेगळा ॥ ४३॥
पाहों जातां आत्मे च्यारी। त्यांचे लक्षण अवधारीं ।
हें जाणोनि अभ्यांतरीं। सदृढ धरावें ॥ ४४॥
एक जीवात्मा दुसरा शिवात्मा। तिसरा परमात्मा जो विश्वात्मा ।
चौथा जाणिजे निर्मळात्मा। ऐसे च्यारी आत्मे ॥ ४५॥
भेद उंच नीच भासती। परी च्यारी एकचि असती ।
येविषीं दृष्टांत संमती। सावध ऐका ॥ ४६॥
घटाकाश मठाकाश। महदाकाश चिदाकाश ।
अवघे मिळोन आकाश। येकचि असे ॥ ४७॥
तैसा जीवात्मा आणि शिवात्मा। परमात्मा आणी निर्मळाता ।
अवघा मिळोन आत्मा। येकचि असे ॥ ४८॥
घटीं व्यापक जें आकाश। तया नाव घटाकाश ।
पिंडी व्यापक ब्रह्मांश। त्यास जीवात्मा बोलिजे ॥ ४९॥
मठीं व्यापक जें आकाश। तया नाव मठाकाश ।
तैसा ब्रह्मांडीं जो ब्रह्मांश। त्यास शिवात्मा बोलिजे ॥ ५०॥
मठाबाहेरील आकाश। तयाअ नांव महदाकाश ।
ब्रह्मांडाबाहेरील ब्रह्मांश। त्यास परमात्मा बोलिजे ॥ ५१॥
उपधीवेगळें आकाश। तया नाव चिदाकाश ।
तैसा निर्मळात्मा परेश। तो उपधिवेगळा ॥ ५२॥
उपाधियोगें वाटे भिन्न। परी तें आकाश अभिन्न ।
तैसा अत्मा स्वानंदघन। येकचि असे ॥ ५३॥
दृश्या सबाह्य अंतरीं। सूक्ष्मात्मा निरंतरीं ।
त्याचि वर्णावया थोरी। शेष समर्थ नव्हे ॥ ५४॥
ऐसे आत्म्याचें लक्षण। जाणतां नाहीं जीवपण ।
उपाधी शोधतां अभिन्न। मुळींच आहे ॥ ५५॥
जीवपणें येकदेसी। अहंकारें जन्म सोसी ।
विवेक पाहतां प्राणीयांसी। जन्म कैंचा ॥ ५६॥
जन्ममृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला ।
तत्वें शोधितां पावला। तत्वता वस्तु ॥ ५७॥
तेचि वस्तु ते आपण। हें माहावाक्याचें लक्षण ।
साधु करीती निरूपण। आपुलेन मुखें ॥ ५८॥
जेचि क्षणी अनुग्रह केला। तेचि क्षणीं मोक्ष जाला ।
बंधन कांहीं आत्मयाला। बोलोंचि नये ॥ ५९॥
आतां आशंका फिटली। संदेहवृत्ती मावळली ।
संतसंगें तत्काळ जाली। मोक्षपदवी ॥ ६०॥
स्वप्नामधें जो बांधला। तो जागृतीनें मोकळा केला ।
ज्ञानविवेकें प्राणीयाला। मोक्षप्राप्ती ॥ ६१॥
अज्ञाननिसीचा अंतीं। संकल्पदुःखें नासती ।
तेणें गुणें होये प्राप्ती। तत्काळ मोक्षाची ॥ ६२॥
तोडावया स्वप्नबंधन। नलगे आणिक साधन ।
तयास प्रेत्न जागृतीवीण। बोलोंचि नये ॥ ६३॥
तैसा संकल्पें बांधला जीव। त्यास आणिक नाही उपाव ।
विवेक पाहतां वाव। बंधन होये ॥ ६४॥
विवेक पाहिल्याविण। जो जो उपाव तो तो सीण ।
विवेक पाहातां आपण। आत्माच असे ॥ ६५॥
आत्मयाचा ठांई कांहीं। बद्ध मोक्ष दोनी नाहीं ।
जन्ममृत्य हें सर्वहि। आत्मत्वीं न घडे ॥ ६६॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
मोक्षलक्षणनाम समास सातवा ॥ ७॥

---

समास आठवा। :। आत्मदर्शन
। । । । ॥ श्रीराम ॥
मागां जाले निरूपण। परमात्मा तो तूंचि जाण ।
तया परमात्मयाचें लक्षण। तें हें ऐसें असे ॥ १॥
जन्म नाही मृत्यु नाहीं। येणें नाहीं जाणें नाहीं ।
बद्ध मोक्ष दोनी नाहीं। परमात्मयासी ॥ २॥
परमात्मा निर्गुण निराकार। परमात्मा अनंत अपार ।
पर्मात्मा नित्य निरंतर। जैसा तैसा ॥ ३॥
पर्मात्मा सर्वांस व्यापक। परमात्मा अनेकीं येक ।
परमात्मयाचा विवेक। अतर्क्य आहे ॥ ४॥
ऐसी परमात्मयाची स्थिती। बोलताती वेद श्रुती ।
परमात्मा पाविजे भक्तीं। येथें संशय नाही ॥ ५॥
तये भक्तीचें लक्षण। भक्ती नवविधा भजन ।
नवविधा भजनें पावन। बहु भक्त जाले ॥ ६॥
तया नवविधामध्यें सार। आत्मनिवेदन थोर ।

तयेचा करावा विचार। स्वानुभवें स्वयें ॥ ७॥
आपुलिया स्वानुभवें। आपणास निवेदावें ।
आत्मनिवेदन जाणावें। ऐसें असे ॥ ८॥
महत्पूजेचा अंतीं। देवास मस्तक वाहाती ।
तैसी आहे निकट भक्ती। आत्मनिवेदनाची ॥ ९॥
आपणांस निवेदिती। ऐसे भक्त थोडे असती ।
तयांस परमात्मा मुक्ती। तत्काळ देतो ॥ १०॥
आपणांस कैसें निवेदावें। कोठें जाऊन पडावें ।
किंवा मस्तक तोडावें। देवापुढें ॥ ११॥
ऐसें ऐकोन बोलणें। वक्ता वदे सर्वज्ञपणें ।
श्रोतां सावधान होणें। येकाग्र चित्तें ॥ १२॥
आत्मनिवेदनाचें लक्षण। आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण। तो वोळखावा ॥ १३॥
देवभक्ताचें शोधन। करितां होतें आत्मनिवेदन ।
देव आहे पुरातन। भक्त पाहे ॥ १४॥
देवास वोळखों जातां। तेथें जाली तद्रूपता ।
देवभक्तविभक्तता। मुळींच नाहीं ॥ १५॥
विभक्त नाहीं म्हणोन भक्त। बद्ध नाहीं म्हणोन मुक्त ।
अयुक्त नाहीं बोलणें युक्त। शास्त्राधारें ॥ १६॥
देवाभक्ताचें पाहातां मूळ। होये भेदाचें निर्मूळ ।
येक परमात्मा सकळ। दृश्यावेगळा ॥ १७॥
तयासि होतां मिळणी। उरी नाहीं दुजेपणीं ।
देवभक्त हे कडसणी। निरसोन गेली ॥ १८॥
आत्मनिवेदनाचे अंतीं। जे कां घडली अभेदभक्ती ।
तये नाव सायोज्यमुक्ती। सत्य जाणावी ॥ १९॥
जो संतांस शरण गेला। अद्वैतनिरूपणें बोधला ।
मग जरी वेगळा केला। तरी होणार नाहीं ॥ २०॥
नदीं मिळाली सागरीं। ते निवडावी कोणेपरी ।
लोहो सोनें होतां माघारी। काळिमा न ये ॥ २१॥
तैसा भगवंतीं मिळाला। तो नवचे वेगळा केला ।
देव भक्त आपण जाला। विभक्त नव्हे ॥ २२॥
देव भक्त दोनी येक। ज्यासी कळला विवेक ।
साधुजनीं मोक्षदायेक। तोचि जाणावा ॥ २३॥
आतां असो हें बोलणें। देव पाहावा भक्तपणें ।
तेणें त्यांचें ऐश्वर्य बाणे। तत्काळ आंगीं ॥ २४॥
देहचि होऊन राहिजे। तेणें देहदुःख साहिजे ।
देहातीत होतां पाविजे। परब्रह्म तें ॥ २५॥
देहातीत कैसें होणें। कैसें परब्रह्म पावणें ।
ऐश्वर्याची लक्षणें। कवण सांगिजे ॥ २६॥
ऐसें श्रोतां आक्षेपिलें। याचे उत्तर काये बोलिलें ।
तेंचि आतां निरोपिलें। सावध ऐका ॥ २७॥
देहातीत वस्तु आहे। तें तूं परब्रह्म पाहें ।
देहसंग हा न साहे। तुज विदेहासी ॥ २८॥
ज्याची बुद्धी होये ऐसी। वेद वर्णिती तयासी ।
शोधितां नाना शास्त्रांसी। न पडे ठाई ॥ २९॥
ऐश्वर्य ऐसें तत्वता। बाणें देहबुद्धि सोडितां
देह मी ऐसें भावितां। अधोगती ॥ ३०॥
याकारणें साधुवचन। मानूं नये अप्रमाण ।
मिथ्या मानितां दूषण। लागों पाहे ॥ ३१॥
साधुवचन तें कैसें। काये धरावें विश्वासें ।
येक वेळ स्वामी ऐसें। मज निरोपावें ॥ ३२॥
सोहं आत्मा स्वानंदघन। अजन्मा तो तूंचि जाण ।
हेंचि साधूचें वचन। सदृढ धरावें ॥ ३३॥
महावाक्याचें अंतर। तुंचि ब्रह्म निरंतर ।
ऐसिया वचनाचा विसर। पडोंचि नये ॥ ३४॥
देहासि होईल अंत। मग मी पावेन अनंत ।
ऐसें बोलणें निभ्रांत। मानूंचि नये ॥ ३५॥
येक मुर्ख ऐसें म्हणती। माया नासेल कल्पांतीं ।
मग आम्हांस ब्रह्मप्राप्ती। येरवीं नाहीं ॥ ३६॥
मायेसी होईल कल्पांत। अथवा देहासी येईल अंत ।
तेव्हां पावेन निवांत। परब्रह्म मी ॥ ३७॥
हें बोलणें अप्रमाण। ऐसें नव्हे समाधान ।
समाधानाचें लक्षण। वेगळेंचि असे ॥ ३८॥
शैन्य अवघेंचि मरावें। मग राज्यपद प्राप्त व्हावें ।
शैन्य अस्तांचि राज्य करावें। हें कळेना ॥ ३९॥
माया असोनिच नाहीं। देह असतांच विदेही ।
ऐसें समाधान कांहीं। वोळखावें ॥ ४०॥
राज्यपद हातासी आलें। मग परिवारें काय केलें ।
परिवारा देखतां राज्य गेलें। हें तों घडेना ॥ ४१॥
प्राप्त जालियां आत्मज्ञान। तैसें दृश्य देहभान ।
दृष्टीं पडतां समाधान। जाणार नाही ॥ ४२॥
मार्गीं मूळी सर्पाकार। देखतां भये आलें थोर ।
कळतां तेथील विचार। मग मारणें काये ॥ ४३॥
तैसी माया भयानक। विचार पाहातां माईक ।
मग तयेचा धाक। कायसा धरावा ॥ ४४॥
देखतां मृगजळाचे पूर। म्हणे कैसा पावों पैलपार ।
कळतां तेथीचा विचार। सांकडें कैंचें ॥ ४५॥
देखतां स्वप्न भयानक। स्वप्नीं वाटे परम धाक ।
जागृती आलीयां साशंक। कासया व्हावें ॥ ४६॥
तथापी माया कल्पनेसी दिसे। आपण कल्पनेतीत असे ।
तेथें उद्वेग काईसे। निर्विकल्पासी ॥ ४७॥
अंतीं मतीं तेचि गती। ऐसें सर्वत्र बोलती ।
तुझा अंतीं तुझी प्राप्ती। सहजचि जाली ॥ ४८॥
चौदेहाचा अंत। आणी जन्म मुळाचा प्रांत ।
अंतांप्रांतासी अलिप्त। तो तुं आत्मा ॥ ४९॥
जयासी ऐसी आहे मती। तयास ज्ञानें आत्मगती ।

गती आणी अवगती। वेगळाचि तो ॥ ५०॥
मति खुंटली वेदांची। तेथें गती आणी अवगती कैंची ।
आत्मशास्त्रगुरुप्रचिती। ऐक्यता आली ॥ ५१॥
जीवपणाची फिटली भ्रांती। वस्तु आली आत्मप्रचिती ।
प्राणी पावला उत्तमगती। सद्‌गुरुबोधें ॥ ५२॥
सद्‌गुरुबोध जेव्हां जाला। चौदेहांस अंत आला ।
तेणें निजध्यास लागला। सस्वरूपीं ॥ ५३॥
तेणें निजध्यासें प्राणी। धेयंचि जाला निर्वाणीं ।
सायोज्यमुक्तीचा धनी। होऊन बैसला ॥ ५४॥
दृश्य पदार्थ वोसरतां। आवघा आत्माचि तत्वता ।
नेहटून विचारें पहातां। दृश्य मुळींच नाहीं ॥ ५५॥
मिथ्या मिथ्यत्वें पाहिलें। मिथ्यापणें अनुभवा आलें ।
श्रोतीं पाहिजे ऐकिलें। या नाव मोक्ष ॥ ५६॥
सद्‌गुरुवचन हृदई धरी। तोचि मोक्षाचा अधिकारी ।
श्रवण मनन केलेंचि करी। अत्यादरें ॥ ५७॥
जेथें आटती दोन्ही पक्ष। तेथें लक्ष ना अलक्ष ।
या नाव जाणिजे मोक्ष। नेमस्त आत्मा ॥ ५८॥
जेथें ध्यान धारणा सरे। कल्पना निर्विकल्पीं मुरे ।
केवळ ज्ञेप्तिमात्र उरे। सूक्ष्म ब्रह्म ॥ ५९॥
भवमृगजळ आटलें। लटिकें बंधन सुटलें ।
अजन्म्यास मुक्त केलें। जन्मदुःखापासुनी ॥ ६०॥
निःसंगाची संगव्याधी। विदेहाची देहबुद्धी ।
विवेकें तोडिली उपाधी। निःप्रपंचाची ॥ ६१॥
अद्वैताचें तोडिलें द्वैत। येकांतास दिला एकांत ।
अनंतास दिला अंत। अनंताचा ॥ ६२॥
जागृतीस चेवविलें। चेईऱ्यास सावध केलें ।
निजबोधास प्रबोधिलें। आत्मज्ञान ॥ ६३॥
अमृतास केलें अमर। मोक्षास मुक्तीचें घर ।
संयोगास निरंतर। योग केला। ६४॥
निर्गुणास निर्गुण केलें। सार्थकाचें सार्थक जालें ।
बहुतां दिवसां भेटलें। आपणासि आपण ॥ ६५॥
तुटला द्वैताचा पडदा। अभेदें तोडिलें भेदा ।
भूतपंचकाची बाधा। निरसोन गेली ॥ ६६॥
जालें साधनाचें फळ। निश्चळास केलें निश्चळ ।
निर्मळाचा गेला मळ। विवेकबळें ॥ ६७॥
होतें सन्निध चुकलें। ज्याचें त्यास प्राप्त जालें ।
आपण देखतां फिटलें। जन्मदुःख ॥ ६८॥
दुष्टस्वप्नें जाजावला। ब्रह्मण नीच याती पावला ।
आपणांसी आपण सांपडला। जागेपणें ॥ ६९॥
ऐसें जयास जालें ज्ञान। तया पुरुषाचें लक्षण ।
पुढिले समासीं निरूपण। बोलिलें असे ॥ ७०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मदर्शननाम समास आठवा ॥ ८॥

---

समास नववा। :। सिद्धलक्षण
। । । । ॥ श्रीराम ॥
अंतरी गेलीयां अमृत। बाह्या काया लखलखित ।
अंतरस्थिति बाणतां संत। लक्षणें कैसीं ॥ १॥
जालें आत्मज्ञान बरवें। हे कैसेनि पां जाणावें ।
म्हणौनि बोलिलीं स्वभावें। साधुलक्षणें ॥ २॥
ऐक सिद्धांचे लक्षण। सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण ।
तेथें पाहातां वेगळेपण। मुळीच नाहीं ॥ ३॥
स्वरूप होऊन राहिजे। तया नाव सिद्ध बोलिजे ।
सिद्धस्वरूपींच साजे। सिद्धपण ॥ ४॥
वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध। सस्वरूप स्वतसिद्ध ।
तयासिच बोलिजे सिद्ध। अन्यथा न घडे ॥ ५॥
तथापी बोलों काहीं येक। साधकास कळाया विवेक ।
सिद्धलक्षणाचें कौतुक। तें हें ऐसें असे ॥ ६॥
अंतरस्थित स्वरूप जाली। पुढें काया कैसी वर्तली ।
जैसी स्वप्नीची नाथिली। स्वप्नरचना ॥ ७॥
तथापि सिद्धांचें लक्षण। कांहीं करूं निरूपण ।
जेणें बाणे अंतर्खूण। परमार्थाची ॥ ८॥
सदा स्वरूपानुसंधान। हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण। जनावेगळा ॥ ९॥
स्वरूपीं दृष्टी पडतां। तुटोन गेली संसारचिंता ।
पुढें लागली ममता। निरूपणाची ॥ १०॥
हें साधकाचें लक्षण। परी सिद्धाआंगीं असे जाण ।
सिद्धलक्षण साधकेंविण। बोलोंच नये ॥ ११॥
बाह्य साधकाचें परी। आणी स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्धलक्षण चतुरीं। जाणिजे ऐसें ॥ १२॥
संदेहरहीत साधन। तेचि सिद्धांचे लक्षण ।
अंतर्बाह्य समाधान। चळेना ऐसें ॥ १३॥
अचळ जाली अंतरस्थिती। तेथें चळणास कैची गती ।
स्वरूपीं लागतां वृत्ती। स्वरूपचि जाली ॥ १४॥
मग तो चळतांच अचळ। चंचळपणें निश्चळ ।
निश्चळ असोन चंचळ। देह त्याचा ॥ १५॥
स्वरूपीं स्वरूपचि जाला। मग तो पडोनिच राहिला ।
अथवा उठोनि पळाला। तरी चळेना ॥ १६॥
येथें कारण अंतरस्थिती। अंतरींच पाहिजे निवृत्ती ।
अंतर लागलें भगवंतीं। तोचि साधु ॥ १७॥
बाह्य भलतैसें असावे। परी अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणे दिसती स्वभावें। साधुआंगीं ॥ १८॥
राजीं बैसतां अवलिळा। आंगीं बाणे राजकळा ।
स्वरूपीं लागतां जिव्हाळा। लक्षणे बाणती ॥ १९॥
येरव्ही अभ्यास करितां। हाता न चढती सर्वथा ।
स्वरूपीं राहावें तत्त्वतां। स्वरूप होउनी ॥ २०॥
अभ्यासाचा मुगुटमणी। वृत्ती राहावी निर्गुणीं ।

संतसंगें निरूपणीं। स्थिती बाणे ॥ २१॥
ऐसीं लक्षणें बरवीं। स्वरूपाकारें अभ्यासावीं ।
स्वरूप सोडितां गोसावी। भांबावती ॥ २२॥
आतां असो हें बोलणें। ऐका साधूची लक्षणें ।
जेणें समाधान बाणे। साधकाअंगीं ॥ २३॥
स्वरूपीं भरतां कल्पना। तेथें कैंची उरेल कामना ।
म्हणौनियां सधुजना। कामचि नाहीं ॥ २४॥
कल्पिला विषयो हातींचा जावा। तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षै ठेवा। जाणार नाहीं ॥ २५॥
म्हणोनि ते क्रोधरहित। जाणती स्वरूप संत ।
नासिवंत हे पदार्थ। सांडुनिया ॥ २६॥
जेथें नाहीं दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी ।
क्रोधरहित चराचरीं। साधुजन वर्तती ॥ २७॥
आपुला आपण स्वानंद। कोणावरी करावा मद ।
याकारणें वादवेवाद। तुटोन गेला ॥ २८॥
साधु स्वरूप निर्विकार। तेथें कैंचा तिरस्कार ।
आपला आपण मत्सर। कोणावरी करावा ॥ २९॥
साधु वस्तु अनायासें। याकारणें मत्सर नसे ।
मदमत्सराचें पिसें। साधुसी नाहीं ॥ ३०॥
साधु स्वरूप स्वयंभ। तेथें कैंचा असेल दंभ ।
जेथे/न् द्वैताचा आरंभ जालाच नाही ॥ ३१॥
जेणें दृष्य केलें विसंच। तयास कैंचा हो प्रपंच ।
याकारणें निःप्रपंच। साधु जाणावा ॥ ३२॥
अवघें ब्रह्मांड त्याचे घर। पंचभूतिक हा जोजार ।
मिथ्या जाणोन सत्वर। त्याग केला ॥ ३३॥
याकारणें लोभ नसे। साधु सदा निर्लोभ असे ।
जयाची वासना समरसे। शुद्धस्वरूपीं ॥ ३४॥
आपुला आपण आघवा। स्वार्थ कोणाचा करावा ।
म्हणोनि साधु तो जाणावा। शोकरहित ॥ ३५॥
दृष्य सांडुन नासिवंत। स्वरूप सेविलें शाश्वत ।
याकारणें शोकरहित। साधु जाणावा ॥ ३६॥
शोकें दुखवावी वृत्ती। तरी ते जाहली निवृत्ती ।
म्हणोनि साधु आदिअंतीं। शोकरहीत ॥ ३७॥
मोहें झळंबावें मन। तरी तें जाहालें उन्मन ।
याकारणें साधुजन। मोहातीत ॥ ३८॥
सधु वस्तु अद्वये। तेथें वाटेल भये ।
परब्रह्म तें निर्भये। तोचि साधु ॥ ३९॥
याकारणें भयातीत। साधु निर्भय निवांत ।
सकळांस मांडेल अंत। साधु अनंतरूपी ॥ ४०॥
सत्यस्वरूपें अमर जाला। भये कैंचें वाटेल त्याला ।
याकारणें साधुजनाला। भयेचि नाहीं ॥ ४१॥
जेथें नाहीं द्वंद्वभेद। आपला आपण अभेद ।
तेथें कैंचा उठेल खेद। देहबुद्धीचा ॥ ४२॥
बुद्धिनें नेमिलें निर्गुणा। त्यास कोणीच नेईना ।
याकारणें साधुजना। खेदचि नाहीं ॥ ४३॥
आपण एकला ठाईचा। स्वार्थ करावा कोणाचा ।
दृष्य नसतां स्वार्थाचा। ठावचि नाहीं ॥ ४४॥
साधु आपणचि येक। तेथें कैंचा दुःखशोक ।
दुजेविण अविवेक। येणार नाहीं ॥ ४५॥
आशा धरितां परमार्थाची। दुराशा तुटली स्वार्थाची ।
म्हणोनि नैराशता साधूची। वोळखण ॥ ४६॥
मृदपणें जैसे गगन। तैसें साधुचें लक्षण ।
याकरणें साधुवचन। कठीण नाहीं ॥ ४७॥
स्वरूपाचा संयोगीं। स्वरूपचि जाला योगी ।
याकरणें वीतरागी। निरंतर ॥ ४८॥
स्थिती बाणतां स्वरूपाची। चिंता सोडीली देहाची ।
याकरणें होणाराची। चिंता नसे ॥ ४९॥
स्वरूपीं लागतां बुद्धी। तुटे अवघी उपाधी ।
याकारणें निरोपाधी। साधुजन ॥ ५०॥
साधु स्वरूपींच राहे। तेथें संगचि न साहे ।
म्हणोनि साधु तो न पाहे। मानापमान ॥ ५१॥
अलक्षास लावी लक्ष। म्हणोनि साधु परम दक्ष ।
वोढूं जाणती कैपक्ष। परमार्थाचा ॥ ५२॥
स्वरूपीं न साहे मळ। म्हणोनि साधु तो निर्मळ ।
साधु स्वरूपचि केवळ। म्हणोनियां ॥ ५३॥
सकळ धर्मामधें धर्म। स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणें मुख्य वर्म। साधुलक्षणाचें ॥ ५४॥
धरीतां साधूची संगती। आपषाच लागे स्वरूपस्थिती ।
स्वरूपस्थितीनें बाणती। लक्षणें आंगीं ॥ ५५॥
ऐसीं साधूचीं लक्षणें। आंगीं बाणती निरूपणें ।
परंतु स्वरूपीं राहाणें। निरंतर ॥ ५६॥
निरंतर स्वरूपीं साहातां। स्वरूपचि होईजे तत्त्वतां ।
मग लक्षणें आंगीं बाणतां। वेळ नाहीं ॥ ५७॥
स्वरूपीं राहिल्यां मती। अवगुण अवघेचि साडती ।
परंतु यासी सत्संगती। निरूपण पाहिजे ॥ ५८॥
सकळ सृष्टीचा ठाई। अनुभव येकचि नाहीं ।
तो बोलिजेल सर्वहि। पुढिले समासीं ॥ ५९॥
कोणें स्थितीनें राहाती। कैसा अनुभव पाहाती ।
रामदास म्हणे श्रोतीं। अवधान देणें ॥ ६०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सिद्धलक्षणनाम समास नववा ॥ ९॥

समास दहावा। : शून्यत्वनिरसन
। । । । ॥ श्रीराम ॥
जनाचे अनुभव पुसतां। कळहो उठिल अवचिता ।
हा कथाकल्लोळ श्रोतां। कौतुकें ऐकावा ॥ १॥
येक म्हणती हा संसारु। करितां पाविजे पैलपारु ।

आपला नव्हे कीं जोजारु। जीव देवाचे ॥ २॥
येक म्हणती हें न घडे। लोभ येऊन आंगीं जडे ।
पोटस्तें करणें घडे। सेवा कुटुंबाची ॥ ३॥
येक म्हणती स्वभावें। संसार करावा सुखें नावें ।
कांहीं दान पुण्य करावें। सद्‌गतीकारणें ॥ ४॥
येक म्हणती संसार खोटा। वैराग्यें घ्यावा देशवटा ।
येणें स्वर्ग्यलोकींच्या वाटा। मोकळ्या होती ॥ ५॥
येक म्हणती कोठें जावें। वेर्थचि कासया हिंडावें ।
आपुलें आश्रमी असावें। आश्रमधर्म करूनी ॥ ६॥
येक म्हणती कैंचा धर्म। अवघा होतसे अधर्म ।
ये संसारीं नाना कर्म। करणें लागे ॥ ७॥
येक म्हणती बहुतांपरी। वासना असावी वरी ।
येणेंचि तरिजे संसारीं। अनायासें ॥ ८॥
येक म्हणती कारण भाव। भावेंचि पाविजे देव ।
येर हें अवघेंचि वाव। गथागोवी ॥ ९॥
येक म्हणती वडिलें जीवीं। अवघीं देवचि मानावीं ।
मायेबापें पूजीत जावीं। येकाभावें ॥ १०॥
येक म्हणती देवब्राह्मण। त्यांचें करावें पूजन ।
मायेबाप नारायेण। विश्वजनाचा ॥ ११॥
येक म्हणती शास्त्र पाहावें। तेथें निरोपिलें देवें ।
तेणें प्रमाणेंचि जावें। परलोकासी ॥ १२॥
येक म्हणती अहो जना। शास्त्र पाहातां पुरवेना ।
याकारणें साधुजना। शरण जावें ॥ १३॥
येक म्हणती सांडा गोठी। वायांचि करिता चाउटी ।
सर्वांस कारण पोटीं। भूतदया असावी ॥ १४॥
येक म्हणती येकचि बरवें। आपुल्या आचारें असावें ।
अंतकाळीं नाम घ्यावें। सर्वोत्तमाचें ॥ १५॥
येक म्हणती पुण्य असेल। तरीच नाम येईल ।
नाहीं तरी भुली पडेल। अंतकाळीं ॥ १६॥
येक म्हणती जीत असावे। तंवचि सार्थक करावें ।
येक म्हणती फिरावें। तीर्थाटण ॥ १७॥
येक म्हणती हे अटाटी। पाणीपाषाणाची भेटी ।
चुबकळ्या मारितां हिंपुटी। कासाविस व्हावें ॥ १८॥
येक म्हणती सांडी वाचाळी। अगाध महिमा भूमंडळीं ।
दर्शनमात्रें होय होळी। माहापातकाची ॥ १९॥
येक म्हणती तीर्थ स्वभावें। कारण मन अवरावें ।
येक म्हणती कीर्तन करावें। सावकास ॥ २०॥
येक म्हणती योग बरवा। मुख्य तोचि आधीं साधावा ।
देहो अमरचि करावा। अकस्मात ॥ २१॥
येक म्हणती ऐसें काये। काळवंचना करूं नये ।
येक म्हणती धरावी सोये। भक्तिमार्गाची ॥ २२॥
येक म्हणती ज्ञान बरवें। येक म्हणती साधन करावें ।
येक म्हणती मुक्त असावें। निरंतर ॥ २३॥
येक म्हणती अनर्गळा। धरीं पापाचा कंटाळा ।
येक म्हणती रे मोकळा। मार्ग आमुचा ॥ २४॥
येक म्हणती हें विशेष। करूं नये निंदा द्वेष ।
येक म्हणती सावकास। दुष्टसंग त्यागावा ॥ २५॥
येक म्हणती ज्याचें खावें। त्या सन्मुखचि मरावें ।
तेणें तत्काळचि पावावें। मोक्षपद ॥ २६॥
येक म्हणती सांडा गोठी। आधीं पाहिजे ते रोटी ।
मग करावी चाउटी। सावकास ॥ २७॥
येक म्हणती पाउस असावा। मग सकळ योग बरवा ।
कारण दुष्काळ न पडावा। म्हणिजे बरें ॥ २८॥
येक म्हणती तपोनिधी। होतां वोळती सकळ सिद्धी ।
येक म्हणती रे आधीं। इंद्रपद साधावें ॥ २९॥
येक म्हणती आगम पाहावा। वेताळ प्रसन्न करून घ्यावा ।
तेणें पाविजे देवा। स्वर्गलोकीं ॥ ३०॥
येक म्हणती अघोरमंत्र। तेणें होईजे स्वतंत्र ।
श्रीहरी जयेचा कळत्र। तेचि वोळे ॥ ३१॥
ती लागले सर्व धर्म। तेथें कैंचें क्रियाकर्म ।
येक म्हणती कुकर्म। तिच्या मदे ॥ ३२॥
येक म्हणती येक साक्षप। करावा मृत्यंजयाचा जप ।
तेणें गुणें सर्व संकल्प। सिद्धीतें पावती ॥ ३३॥
येक म्हणती बटु भैरव। तेणें पाविजे वैभव ।
येक म्हणती झोटिंग सर्व। पुर्वितसे ॥ ३४॥
येक म्हणती काळी कंकाळी। येक म्हणती भद्रकाळी ।
येक म्हणती उचिष्ट चांडाळी। साहें करावी ॥ ३५॥
येक म्हणती विघ्नहर। येक म्हणती भोळा शंकर ।
येक म्हणती सत्वर। पावे भगवती ॥ ३६॥
येक म्हणती मल्लारी। सत्वरचि सभाग्य करी ।
येक म्हणती माहा बरी। भक्ति वेंकटेशाची ॥ ३७॥
येक म्हणती पूर्व ठेवा। येक म्हणती प्रेत्न करावा ।
येक म्हणती भार घालावा। देवाच वरी ॥ ३८॥
येक म्हणती देव कैंचा। अंतचि पाहातो भल्यांचा ।
येक म्हणती हा युगाचा। युगधर्म ॥ ३९॥
येक आश्चीर्य मानिती। येक विस्मयो करिती ।
येक कंटाळोन म्हणती। काये होईल तें पाहावें ॥ ४०॥
ऐसे प्रपंचिक जन। लक्षणें सांगतां गहन ।
परंतु कांहीं येक चिन्ह। अल्पमात्र बोलिलों ॥ ४१॥
आतां असो हा स्वभाव। ज्ञात्यांचा कैसा अनुभव ।
तोहि सांगिजेल सर्व। सावध ऐका ॥ ४२॥
येक म्हणती करावी भक्ती। श्रीहरी देईल सद्गती ।
येक म्हणती ब्रह्मप्राप्ती। कर्मेंचि होये ॥ ४३॥
येक म्हणती भोग सुटेना। ज्न्ममरण हें तुटेना ।
येक म्हणती उर्मी नाना। अज्ञानाच्या ॥ ४४॥
येक म्हणती सर्व ब्रह्म। तेथें कैंचें क्रियाकर्म ।

येक म्हणती हा अधर्म। बोलोंचि नये ॥ ४५॥
येक म्हणती सर्व नासें। उरलें तेंचि ब्रह्म असे ।
येक म्हणती ऐसें नसे। समाधान ॥ ४६॥
सर्वब्रह्म केवळ ब्रह्म। दोनी पूर्वपक्षाचे भ्रम ।
अनुभवाचें वेगळें वर्म। म्हणती येक ॥ ४७॥
येक म्हणती हें न घडे। अनुर्वाच्य वस्तु घडे ।
जें बोलतां मोन्य पडे। वेदशास्त्रांसी ॥ ४८॥
तव श्रोता अनुवादला। म्हणे निश्चये कोण केला ।
सिद्धांतमतें अनुभवाला। उरी कैंची ॥ ४९॥
अनुभव देहीं वेगळाले। हें पूर्वीच बोलिलें ।
आतां कांहीं येक केलें। नवचे कीं ॥ ५०॥
येक साक्षत्वें वर्तती। साक्षी वेगळाचि म्हणती ।
आपण दृष्टा ऐसी स्थिती। स्वानुभवाची ॥ ५१॥
दृश्यापासून द्रष्टा वेगळा। ऐसी अलिप्तपणाची कळा ।
आपण साक्षत्वें निराळा। स्वानुभवे ॥ ५२॥
सकळ पदार्थ जाणतां। तो पदार्थाहून पर्ता ।
देहीं असोनी अलिप्तता। सहजचि जाली ॥ ५३॥
येक ऐसें स्वानुभवें। म्हणती साक्षत्वें वर्तावें ।
दृश्य असोनि वेगळें व्हावें। द्रष्टेपणें ॥ ५४॥
येक म्हणती नाहीं भेद। वस्तु ठाईंची अभेद ।
तेथें कैंचा मतिमंद द्रष्टा आणिला ॥ ५५॥
अवघी साकरचि स्वभावें। तेथें कडु काय निवडावें ।
द्रष्टा कैंचा स्वानुभवें। अवघेंचि ब्रह्म ॥ ५६॥
प्रपंच परब्रह्म अभेद। भेदवादी मानिती भेद ।
परी हा आत्मा स्वानंद। आकारला ॥ ५७॥
विघुरलें तुप थिजलें। तैसें निर्गुणचि गुणा आलें ।
तेथें काय वेगळें केलें। द्रष्टेपणें ॥ ५८॥
म्हणौनि द्रष्टा आणी दृश्य। अवघा येकचि जगदीश ।
द्रष्टेपणाचे सायास। कासयासी ॥ ५९॥
ब्रह्मचि आकारलें सर्व। ऐसा येकांचा अनुभव ।
ऐसे हे दोनी स्वभाव। निरोपिले ॥ ६०॥
अवघा आत्मा आकाराअ। आपण भिन्न कैंचा उरला ।
दुसरा अनुभव बोलिला। ऐसियापरी ॥ ६१॥
ऐक तिसरा अनुभव। प्रपंच सारूनियां सर्व ।
कांहीं नाहीं तोचि देव। ऐसें म्हणती ॥ ६२॥
दृश्य अवघें वेगळें केलें। केवळ अदृश्यचि उरलें ।
तेंचि ब्रह्म अनुभविलें। म्हणती येक ॥ ६३॥
परी तें ब्रह्म म्हणों नये। उपायासारिखा अपाये ।
सुन्यत्वास ब्रह्म काये। म्हणों येईल ॥ ६४॥
दृश्य अवघें वोलांडिलें। अदृश्य सुन्यत्वीं पडिलें ।
ब्रह्म म्हणौनि मुरडलें। तेथुनिच मागे ॥ ६५॥
इकडे दृश्य तिकडे देव। मध्यें सुन्यत्वाचा ठाव ।
तयास मंदबुद्धिस्तव। प्राणी ब्रह्म म्हणे ॥ ६६॥
रायास नाहीं वोळखिलें। सेवकास रावसें कल्पिलें ।
परी तें अवघें वेर्थ गेलें। राजा देखतां ॥ ६७॥
तैसें सुन्यत्व कल्पिलें ब्रह्म। पुढें देखतां परब्रह्म ।
सुन्यत्वचा अवघा भ्रम। तुटोन गेला ॥ ६८॥
परी हा सूक्ष्म आडताळा। वारी विवेकें वेगळा ।
जैसें दुग्ध घेऊन जळा। राजहंस सांडी ॥ ६९॥
आधीं दृश्या सोडिलें। मग सुन्यत्व वोलांडिलें ।
मूळमायेपरतें देखिलें। परब्रह्म ॥ ७०॥
वेगळेपणें पाहाणें घडे। तेणें वृत्ति सुन्यत्वीं पडे ।
पोटीं संदेह पवाडे। सुन्यत्वाचा ॥ ७१॥
भिन्नपणें अनुभविलें। तयास सुन्य ऐसें बोलिलें ।
वस्तु लक्षितां अभिन्न जालें। पाहिजे आधीं ॥ ७२॥
वस्तु आपणचि होणें। ऐसें वस्तुचें पाहाणें ।
निश्चयेंसीं भिन्नपणें। सुन्यत्व लाभे ॥ ७३॥
याकारणें सुन्य कांहीं। परब्रह्म होणार नाहीं ।
वस्तुरूप होऊन पाहीं। स्वानुभवें ॥ ७४॥
आपण वस्तु सिद्धचि आहे। मन मी ऐसें कल्पूं नये ।
साधु सांगती उपाये। तूंचि आत्मा ॥ ७५॥
मन मी ऐसें नाथिलें। संतीं नाहीं निरोपिलें ।
मानावें कोणाच्या बोलें। मन मी ऐसें ॥ ७६॥
संतवचनीं ठेवितां भावे। तोचि शुद्ध स्वानुभव ।
मनाचा तैसाच स्वभाव। आपण वस्तु ॥ ७७॥
जयाचा घ्यावा अनुभव। तोचि आपण निरावेव ।
आपुला घेती अनुभव। विश्वजन ॥ ७८॥
लोभी धन साधूं गेले। तंव ते लोभी धनचि जाले ।
मग भाग्यपुरुषीं भोगिलें। सावकास ॥ ७९॥
तैसें देहबुद्धी सोडितां। साधकास जालें तत्वता ।
अनुभवाची मुख्य वार्ता। ते हे ऐसी ॥ ८०॥
आपण वस्तु मुळीं येक। ऐसा ज्ञानाचा विवेक ।
येथून हा ज्ञानदशक। संपूर्ण जाला ॥ ८१॥
आत्मज्ञान निरोपिलें। येथामतीनें बोलिलें ।
न्यूनपर्ण क्ष्मा केलें। पाहिजे श्रोतीं ॥ ८२॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सुन्यत्वनिर्शननाम समास दहावा ॥ १०॥
॥ दशक आठवा समाप्त ॥ ८॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.

Last updated October 15, 2005